
छोटीशी चूक तुरुंग बुक

FREE e आवृत्ती
chitralekha.com/marathiemag

१९८९ पासून सदा अग्रेसर साप्ताहिक

९ नोव्हेंबर २०२०

# चित्रलेखा



## आर्टिफिशल इंटेलिजन्स

मशीनला बुद्धी देण्यात शहाणपणा किती?

# दगडावर फुले चैतन्य खुले

एखाद्याचं कल्याण व्हावं म्हणून बरेचजण दान करतात. पण दान करणारा मनामध्ये स्वतःच्याच कल्याणाचा हिशेब करताना दिसतो. म्हणून मी ठरवून टाकलं की, तुमच्या सहवासात राहून आपापसात हसत राहण्यातच मौज आहे! आणि पाहा तर खरं, कसकसे खेळ चाललेत ते!

तुमच्या चरणाशी नैवेद्याची ताटं ठेवली जातात, अन्नछत्रं झडतात आणि आपण एकमेकांकडे मुकाटपणे पाहत राहतो! तुम्हाला यातलं काही खाता येत नाही! असं होतं तेव्हा तुम्ही हसता आणि मीही हसतो!

माणसं आपल्या सोयीनुसार तुमचे कार्यक्रम नक्की करतात. पुजाऱ्याला झोप घ्यावीशी वाटली की, तो तुमची दारं बंद करतो आणि जाहीर करून टाकतो की, 'देवाधिदेव आता निद्रा घेत आहेत!' ही घोषणा ऐकून तुम्ही आणि मी दोघेही खदखदा हसत सुटतो!

तुम्ही सर्वांमध्ये फिरत असता तरीही माणसं तुम्हाला शोधण्यासाठी पर्वताच्या शिखरावर येतात आणि पर्वतावर राहणारी माणसं तुम्हाला शोधायला खाली दरीत भटकत राहतात. तुमच्या नावाने दगडावर फुलं वाहतात, पण फुलांमध्ये दगडापेक्षाही जास्त चैतन्य खुलत असते, याचा कुणी विचार करीत नाही. मग तुम्हाला हसू येतं आणि मीही हसू लागतो!

कुणी 'भगवद् गीता'मध्ये तुमचं दर्शन घेतात, कुणी कुराणात तुमची शक्ती पाहतात तर कुणी बायबलमध्ये तुमची पावलं बघतात. पण तुमचे हे सर्व चाहते जेव्हा एकत्र येतात, तेव्हा वाद-विवादाला सुरुवात करतात. क्रोध, तिरस्कार आणि ईर्षा प्रकट करतात. या गोष्टीमध्ये तुम्हाला स्वारस्य नाही, हेही त्यांच्या लक्षात येत नाही! ते पाहून तुम्ही हसता आणि मी पण हसतो.

तुम्ही सत्य आहात, पण तुमच्या नावाने सत्यनारायणाची पूजा करतात आणि स्वतःला सत्यव्रती समजतात. मात्र त्यांच्या आचरणात असत्याशिवाय दुसरं काहीच नसतं.

एखाद्याचं कल्याण व्हावं म्हणून बरेचजण दान करतात. पण दान करणारा मनामध्ये स्वतःच्याच कल्याणाचा हिशेब करताना दिसतो. 'मी रुपया दिला तर देव मला दहापट देईल!' अशी त्यांची आंतरिक भावना असते.

हे सारं पाहून आपण दोघे खदखदा हसतो आणि हास्याची ही देवाण-घेवाण आपल्यामध्ये अनंत काळ चालू राहील. तुमचं हास्य टिकून राहिलंय म्हणूनच सृष्टीत चारही बाजूला चैतन्याची कारंजी उडत आहेत आणि त्यामुळेच शुभ-तत्त्वाची आकांक्षा जिवंत राहिलेली आहे.

आज नाही तर कदाचित उद्या; सर्वांना कळून येईल की, रडून किंवा रडवून कधीही हास्य निर्माण होत नाही!

आणि हे सत्य मानवाला कळून येत नाही तोपर्यंत आपण दोघेही एकमेकांकडे पाहून सदैव हसत राहू! ◘





चित्रलेखा

दि. ९-११-२०२० | वर्ष:३१ |
अंक: १२ सलग अंक: १६२०

संस्थापक: वजु कोटक
सहसंस्थापक: मधुरी कोटक
मार्गदर्शक: हरकिसन महेता
चेअरमन: मौलिक कोटक
व्हाइस चेअरमन: मनन कोटक

संपादक: ज्ञानेश महाराव *
आर्ट डायरेक्टर: देवेंद्र बंतपेल्लीवार

प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहार:
'चित्रलेखा', २५, अंधेरी इंडस्ट्रियल इस्टेट, ऑफ वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३.
फोन : ६६९२१६९२

जाहिरात विभाग
फोन : (९१-२२) २६७३०८५८
ई-मेल
marathieditor@chitralekha.com
subscribe@chitralekha.com
advertise@chitralekha.com

मुद्रक-प्रकाशक : मौलिक कोटक
'चित्रलेखा' प्लॉट नं.इ.एल-२
टीटीसी इंडस्ट्रियल एरिया,
एमआयडीसी महापे, नवी मुंबई

*चित्रलेखातील मजकूर आणि फोटोचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगी शिवाय करू नये. - संपादक*

* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.

www.feedback@chitralekha.com

वितरण विभाग
टपालाद्वारे अंक: वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. १०५५/-
विदेशात रु. ६५००/-
'चित्रलेखा'च्या नावे पाठवलेली म. ऑ. आणि डिमांड ड्राफ्टच स्वीकारले जातील.
संपर्क: ०२२-६६९९८३१६
०२२-६७३०९८९८ Ext-२५/७२

मालक: चित्रलेखा
MEMBER: INS




चित्रेः **जयदेव**




**सण-उत्सवाला 'स्वदेशी' साहित्य खरेदी करा!**

*– प्रधानमंत्री नरेंद्र मोदी*

–बरेच दिवस परदेशी वारी झाली नाही, त्याचा राग असा काढता का?

**'काँग्रेस'ने पंधरा मिनिटांचा फॉर्म्युला १९६२ ला का वापरला नाही?**

*– केंद्रीय गृहमंत्री अमित शहा*

–'काँग्रेस'च्या नावे अजून किती वर्षं ठोकणार?

**कामचुकार अधिकाऱ्यांना मी हाकलून लावले!**

*– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी*

–'३५३'चे कवच काढून टाका. त्याशिवाय काम नाही होणार !

**महाराष्ट्रावर एकहाती भगवा फडकवायचा आहे!**

*– मुख्यमंत्री उद्धव ठाकरे*

–अशी कामं न बोलता करावीत. नाहीतर मुख्यमंत्र्याचा 'टरबूज' होतो !

**खोट्या बातम्यांत तरुणांना फार काळ फसवता येणार नाही!**

*– 'रिझर्व बँक'चे माजी गव्हर्नर रघुराम राजन*

–भारत-पाकिस्तान हा एक खेळ आहे की अजून!

**वाढीव वीज बिलासंदर्भात राज्यपालांशी चर्चा केली!**

*– 'मनसे' अध्यक्ष राज ठाकरे*

–त्या निमित्ताने कोश्यारी यांना 'राजदर्शन' झालं!

**'भाजप' हा पक्ष बहुजनांचा नाहीच!**

*– माजी 'भाजप' नेते एकनाथ खडसे*

–हे 'राष्ट्रवादी'त प्रवेश घेतल्यावर समजलं का?

**उद्धव ठाकरे म्हणजे पुळचट माणूस!**

*– 'भाजप' खासदार नारायण राणे*

–त्यांच्यावर टीका करून करून तुम्ही खुळचट वाटू लागलाय, त्याचे काय?

**'भाजप'मधील मोठे नेते 'राष्ट्रवादी'च्या वाटेवर!**

*– आमदार रोहित पवार*

–सत्तेसाठी येणारे, सत्तेसाठी जातात, हे लवकर विसरलात!

**शिवसेना दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे नव्हे, तर वाया गेलेल्या मुलाचा बाप बोलत होता!**

*– माजी खासदार निलेश राणे*

–मुख्यमंत्री 'बापमाणूस' आहे, हे कबूल करता तर!

**'मोदी सरकार' मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत!**

*– एक बातमी*

–अरे बापरे, अजून झटके यायचे बरे झाले नाहीत वाटतं !

**अभिनेत्री पायल घोष हिचा 'आरपीआय'मध्ये प्रवेश!**

*– एक बातमी*

–बहुतेक केंद्रात 'आरपीआय'ला अजून एक मंत्रीपद मिळणार!

▫ वज्रधारी

पुढील छापील अंक

सदा अग्रेसर साप्ताहिक

# चित्रलेखा

## दीपोत्सव २०२०

## यश-माहिती-विनोदाचा धूमधडाका

'कोरोना- लॉकडाऊन'च्या अवघड काळाने काय शिकवलं ते सांगताहेत-

### काम की बात

अभिनेता शशांक केतकर • पार्श्वगायिका कार्तिकी गायकवाड • कोरोना वॉरियर डॉ. मुझफ्फर लकडावाला
फिल्म ॲक्टर सोनू सूद • टीव्ही ॲक्टर मंदार चांदवडकर • 'आय टी' कंपनी सीईओ सचिन टेके
परिचारिका प्रियांका नारकर

हास्याची आतषबाजी धमाल फटकेबाजी

बाळासाहेब ठाकरे यांचे वर्तमानाचा समाचार घेणारे काल्पनिक तुफानी भाषण

डॉ.अशोक राणा लिखित प्रदूषणमुक्त दिवाळी

संतोष पवार यांची विनोदी लस की बात

चित्रलेखाच्या नेहमीच्या 'वाचकप्रिय' लेखक-सदरांसह 'दिवाळी स्पेशल' ज्ञान व माहितीपूर्ण रिपोर्ट.

दिवाळी आनंददायी करण्यासाठी
वृत्तपत्र विक्रेत्याकडे
'चित्रलेखा-दीपोत्सव विशेषांक
आजच बुक करा!
हा 'चित्रलेखा दीपोत्सव विशेषांक'
९/१० नोव्हेंबरला प्रकाशित होईल!
किंमत ३५ रुपये

या छापील अंकासाठी वृत्तपत्र विक्रेत्यांनी चित्रलेखा-वितरण व्यवस्थेशी संपर्क साधावा :

**विजय पांडे - ९८१९८९५८००/७९७७९६५३९२**

# भागवती हिंदुत्वाचे कर्मकांड

ज 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि परिवार आपण कोदंडधारी रामाचा आदर्श ठेवून देशकार्य करीत असल्याचं दाखवत असला, तरी प्रत्यक्षातलं त्यांचं दिसणं-वागणं दहातोंडी रावणासारखं आहे. ह्याची साक्षच खुद्द सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी संघाच्या 'विजयादशमी' मेळाव्यातील भाषणातून दिलीय. नागपुरात 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'चं मुख्यालय आहे. तिथे दरवर्षीच्या दसऱ्याला संघ सेवकांच्या भव्य उपस्थितीत संघाचा 'विजयादशमी' उत्सव होतो. यंदा तो 'कोरोना'च्या नियमावलीच्या कारणात्सव ५० स्वयंसेवकांच्या उपस्थितीत झाला. परंतु, त्यात मोहन भागवत जे 'हिंदू-हिंदुत्व-हिंदूराष्ट्र' अनुषंगाने बोलले; त्याचे पडसाद त्याच संध्याकाळीच मुंबईत दादर येथील 'वीर सावरकर स्मारक सभागृहा'त झालेल्या 'शिवसेना'च्या दसरा मेळाव्यात उमटले. अलीकडेच, 'कोरोना लॉकडाऊन'च्या नियमानुसार बंद करण्यात आलेली मंदिरं दर्शनासाठी खुली करावीत, यासाठी 'संघ-भाजप' संबंधित संघटनांनी घंटानाद आंदोलन केले होते. या मागणीसाठी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना निवेदनही दिले होते. त्या संबंधाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे राज्यपालांनी पत्राद्वारे विचारणा करताना, 'हिंदुत्ववादी शिवसेना 'सेक्युलर' झालीय का,' अशा आशयाचा खोचक प्रश्न विचारला होता. तो देशाच्या 'सेक्युलर संविधान'नुसार राज्यपाल झालेल्या कोश्यारी यांना मारक ठरला. राज्यपालांच्या या वक्तव्याविरोधात उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही कोश्यारी यांना फटकारले. या प्रकरणाचा स्पष्ट उल्लेख मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात केला नाही. पण त्याच अनुषंगाने ते म्हणाले, 'संघासाठी 'हिंदुत्व' हा शब्द आपल्या प्रथा-परंपरांवर आधारित मूल्यपद्धतीचा आहे. हिंदुत्व हे देशाच्या सत्त्वाचे सार आहे. संघाच्या दृष्टिकोनातून हिंदुत्वाचा अर्थ व्यापक असून, त्याला पूजापद्धतीशी जोडून संकुचित करण्याचा प्रयत्न करण्यात आलाय!' हा नादान प्रयत्न कुणी केला वा कोण करतंय, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी सरसंघचालकांना केला पाहिजे होता. परंतु त्यांना 'भाजप'च्या राजकारणावर टीका करायची असल्याने, त्यांनी 'भाजप'ला 'संघाकडून हिंदुत्व नीट शिकून घ्या,' असा सल्ला सरसंघचालकांच्या भाषणातील विधानांच्या दाखला देऊन दिला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाची भूमिका जाहीर केल्यापासून (१९८६) 'संघ-भाजप परिवारा'तर्फे 'शिवसेना'च्या



हिंदुत्वाला 'बेगडी' ठरवण्याची खोड अधूनमधून काढली जाते. त्याला 'शिवसेना' नेतृत्वाकडून उत्तर देताना, कधी सावरकरांच्या तर कधी संघाच्या 'हिंदुत्ववादी' भूमिकांचे दाखले देत 'शिवसेना'चे हिंदुत्व 'दगडी' (भक्कम) कसे ते सुनावले जाते. त्यातून सावरकरांनी आणि संघाने एकमेकांच्या हिंदुत्वाला खोटे ठरवण्यासाठी काय काय उद्योग केले, याची जाण 'शिवसेना' नेतृत्वाला नाही; हेच स्पष्ट होतं. तसं यावेळीही झालं. संघाने आपल्या हिंदुत्वाच्या भूमिकेच्या प्रसार–प्रचारासाठी 'जनसंघ–भाजप' या आपल्या राजकीय शाखांमार्फत गायीला 'गोमाता' करून वापरली. त्यातून समाजात मुस्लीम द्वेष वाढवला. याउलट, सावरकर म्हणतात, 'गाय हा उपयुक्त पशू आहे. ती महामाता असेल तर ती बैलाची! गायीच्या पोटात म्हणे, ३३ कोटी देव असतात! मग मालकाने गायीला फटके मारल्यावर तिच्या पोटातील देव–देवता लंबे झाले पाहिजेत!' सावरकरांनी कर्मकांड, पोथ्या–पुराणातली चमत्कार नाकारलेत. त्या सावरकरांना संघाने आपल्यात सामावून घेतले असते, तर मोहन भागवतांवर 'हिंदुत्व कर्मकांडात नाही,' असे म्हणण्याची वेळ आज आली नसती. तथापि, 'आजही हिंदूंनी सार्वजनिक पत्थरी देव–देवतांचे उच्चाटन आणि भट–ब्राह्मणांना रिटायर केल्यास; कर्मकांड व फालतू पूजापद्धती आपोआप विसर्जित होईल,' असे काही व्यावहारिक बोलण्याचे भागवतांना सुचत नाही! आणि तसे काही त्यांना सुनावायचे, 'देव–देवळात भटाचे पोट असते,' हे सत्य ठणकावून सांगणाऱ्या 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या नातवालाही सुचत नाही! प्रबोधनकारांचं हिंदुत्व ज्वलंत आहे. त्यावर भागवतांनी संघाचं हिंदुत्व एकदा तपासून घ्यावं आणि मगच 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हा देशाचे आणखी तुकडे पाडणारा 'पांचजन्य' फुंकावा. हा 'भारताच्या संविधाना'ला आव्हान देणारा 'शंख' उद्धव ठाकरेंना हिंदुत्वाची प्रेरक शक्ती वाटतो. असो. प्रबोधनकारांच्या ज्वलंत हिंदुत्वात संघाच्या सोवळ्या आणि सावरकरांच्या ओवळ्या हिंदुत्वाची राख होते. प्रबोधनकारांचं हिंदुत्व हे सर्व प्रकारची थोतांडं, कर्मकांड यांचं उच्चाटन करून देशाला एकसंध ठरवणारं मूल्य लोकांत प्रस्थापित करणारं आहे. ते मूल्य मानवतेचं आहे. समानतेचा आग्रह धरणारं आहे. ते अस्सल हिंदुत्व आहे.

## दूध ओतायचं शेण खायचं

**इस्लामींची** 'इस्लामीयत' आहे. ख्रिस्त्यांची 'ख्रिश्च्यानिटी' आहे. जैनांचा 'जैनिझम' आणि बौद्धांचा 'बौद्धिझम'आहे. या साऱ्यात थोड्या–फार प्रमाणात कट्टरता आहे. याउलट हिंदूंचे हिंदुत्व तसे नाही. ते इतर धर्मीयांनाही त्यांच्या संस्कृतीसह सामावून घेते. हिंदूधर्मात कट्टरता आणि सनातनी वृत्ती आहे. तसा त्यांचा अतिरेक मोडून काढणारा पुरोगामीपणाही आहे. नीच भटशाहीने लादलेली अस्पृश्यता, जातीयता, वर्ण्यव्यवस्था आहे. पण ती झुगारून टाकणारी संत–सुधारकांची दीर्घ परंपराही आहे. हिंदुत्व असे व्यापक आहे. ते




राष्ट्रीयत्वाची जोडणे, हा इतर धर्मीयांना डिवचणारा खोडसाळपणा झाला. हिंदुत्व हे परधर्मीयातलं जे लोकोद्धाराचं कार्य आहे, ते सामावून घेणारं आहे. हिंदू संस्था–संघटनांचं सेवाकार्य ही ख्रिस्ती मिशनऱ्यांची देन आहे. अनाथ–गरिबांसाठी दान–देणगी देणं, हे मुस्लिमांच्या 'जकाती'मधून आलंय. बौद्ध धर्माचं उगमस्थान भारतात आहे. पण तो धर्म परदेशात विस्तारला. 'फॉरेन रिटर्न' झाल्यावर त्याने भारतालाही शांततेचा मंत्र दिला. 'जैन', 'शीख' हे भारतातच वाढ–विस्तार झालेले धर्म आहेत. या साऱ्यांना सामावून घेण्याची शक्ती–बुद्धी केवळ हिंदुत्वात आहे. ही सर्वसमावेशकता म्हणजेच हिंदुस्तानी संस्कृती. इतकी व्यापकता संघाच्या हिंदुत्वात असती, तर देशात हिंसक दहशतवादाला आमंत्रण देणारा अयोध्येतला मंदिर–मशीद वाद 'संघ–भाजप' परिवाराने ३०–३५ वर्षं खेळवला नसता. सत्ताप्राप्तीसाठी वापरला नसता. यांच्या सत्तालोभाने सावरकरांचे हिंदुत्वही ट्रकच्या साखळीला धरून सायकलस्वार जसा प्रवास करतो, तसे पळाले. ते 'शिवसेना' नेतृत्वाने डबलसीट बसून वापरले आणि ते अडगळीत निघालेल्या सावरकरवाद्यांनी सोयीने वापरूही दिले. यातून आंधळ्याच्या हाताला लागलेल्या हत्तीसारखे हिंदुत्वाचे दर्शन घडले. त्यात कर्मकांडांचे, थोतांडांचे, अंधश्रद्धांचे प्रदर्शन मांडले गेले; अंधभक्त माजवले गेले. भगव्या शेमल्या–फेटेवाल्या नामट्यांची वर्दळ वाढली. जत्रा–पत्थरा–यात्रा वाढल्या. हिंदूंत कट्टरता आणि परधर्मद्वेष वाढला. अल्पसंख्याकांच्या कट्टरतेतून वाढणारा दहशतवाद बहुसंख्याकांच्या विवेकबुद्धीने शमवता येतो. याउलट, बहुसंख्याकांची कट्टरता, दहशत ही अल्पसंख्याकांचं जीणं हराम करतेच; पण त्यापेक्षा अधिक ती बहुसंख्याकांच्या नाशाला आणि देशाच्या अखंडतेला घातक ठरते. स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्यांनी गोमांसाच्या संशयाखाली दलितांची चामडी सोलून काढली. ख्रिस्ती धर्मप्रसारकांना जाळून मारले. मुस्लीम अखलाक याला झुंडीने घरात घुसून ठार केले. याची चर्चा खूप झाली. त्याचवेळी नरेंद्र दाभोलकर, कॉम्रेड पानसरे, कुलबर्गी या विद्वान समाजकार्यकर्त्यांचे खून ते हिंदू असूनही झाले, याची चर्चा मात्र फारशी

झाली नाही. हे तिघेही हिंदू धर्माच्या २५ दार्शनिकांपैकी एक असणाऱ्या चार्वाकाच्या देव–धर्म–तत्त्वज्ञान यांच्या चिकित्सा परंपरेचे पाईक होते. ते हिंदूंचेच देव–धर्म यांच्या माध्यमातून होणारे शोषण जगजाहिर करीत होते. त्यांची हत्या हिंदू सनातनी प्रवृत्तींनी केली म्हणून शंकराचार्यांनी अश्रू ढाळले नाहीत की, सरसंघचालकांनी हळहळीचे दोन शब्द व्यक्त केले नाही. हा खुनशीपणा हिंदूंच्या कर्मकांडापेक्षा अधिक धर्मविघातक आहे. तो कोणाच्या हिंदुत्वाची शोभा वाढवतो? हिंदुत्व हे गायीसारखं आहे. गाय चारा खाते. पचवते. मग ती दूधही देते आणि शेणही देते. दूध हे पौष्टिक. शेण हे जळणासाठी, निर्जंतुकीकरणासाठी उपयुक्त. पण दूध हंडे–हंडे भरून पत्थरी देव–देवतांवर ओतायचं आणि शेण–गोमूत्र खायचं–प्यायचं, असले उलटे उद्योग, गेली ३० वर्षं 'हिंदू व्होट' बँक तयार करून वापरण्यासाठी देशात सुरू आहेत. त्यासाठीच आसाराम–रामरहीम यांसारखे बुवा–महाराज वाढवण्यात आले. सत्संग–अध्यात्माचा बाजार फुलवण्यात आला. हे सारे बोगस असल्याचे 'कोरोना'ने स्पष्ट केलंय. हा चोरबाजार 'कोरोना'चं संकट संपताच उठणार आहे. तो या बाजाराचा आद्यप्रवर्तक असलेल्या संघावर उलटू नये, याची काळजी घेण्यासाठी मोहनपंतांनी कर्मकांड–पूजापद्धती यापेक्षा संघाचं हिंदुत्व कसं वेगळं आहे, ते सांगण्याची मखलाशी केलीय. हे शेण खाल्ल्याने मळमळू लागल्यावर, गोमूत्राच्या गुळण्या घेऊन ओकाऱ्या काढण्यासारखं आहे. अशाचं हिंदुत्व इतकं बाजारू असेल, तर हिंदुराष्ट्राचं स्वप्न किती बोगस असेल, याचा अंदाज यावा.

## प्रबोधनकारांची वाट हिंदुत्व सफाचाट

**'जनसंघ'** (कार्यकाल : १९५१ ते ७७) असल्यापासून 'संघ–भाजप' परिवाराची ओळख ही भटजी–शेठजींची पक्ष–संघटना अशीच होती आणि आहे. 'भाजप हा कधीच बहुजनांचा पक्ष नव्हता,' असं आता 'राष्ट्रवादी काँग्रेसवासी' झालेले एकनाथ खडसे म्हणतात. तथापि, त्यांनी 'भाजप'मध्ये असतानाच 'संघाच्या गाळणीतून भाजपचं नेतृत्व' कशाप्रकारे तयार होतं,' याची माहिती दिली आहे. तेव्हा ते म्हणाले होते, 'संघात गाढव जरी पाठवले, तरी तो संस्काराने चांगला माणूस म्हणून तयार होतो!' याच न्यायाने 'मोदी सरकार' देशात आल्यापासून गेल्या सहा वर्षांत अनेक राजकीय नेते, लोकप्रतिनिधी संघाच्या शिबिरात, कार्यक्रमात हजेरी लावून गाढवाचे गोविंदराव झाले आहेत.



अर्थात, ही चलाखी खऱ्या नोटा घेऊन खोट्या 'नोटांचा पाऊस' पाडणाऱ्या बुवाबाजीपेक्षा वेगळी नाही. हा खोटेपणा संघ परिवार स्थापनेपासून (१९२५) करीत आहे. त्यासाठी 'हिंदुराष्ट्र निर्माणासाठी हिंदू संघटन' असा शंखनाद सुरू असतो. सावरकरांचे जेलमुक्ततेसाठीचे माफीनामे, मुस्लीमद्वेषी हिंदुत्व हे वादाचे मुद्दे आहेत. तथापि, त्यांच्या अखंड हिंदुराष्ट्राच्या आग्रहात स्पष्टता होती, प्रामाणिकता होती, ती नाकारता येण्यासारखी नाही. ती संघ परिवाराच्या हिंदुत्वाचे गिलिट साफ करण्यासाठी पुरेशी आहे. सावरकरांनी आपल्या पक्ष–संघटनेचं नाव 'हिंदू महासभा' असं ठेवलं. याउलट, संघ परिवाराने आपल्या पक्ष संघटनांच्या नावापासूनच 'हिंदू' या शब्दाला दूर ठेवीत हिंदुत्वनिष्ठेचे सोंग–ढोंग सत्तालाभासाठी नाचवत ठेवले. ते १८५७ च्या बंडापासून सुरू आहे. त्याची चिरफाड करताना 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे म्हणतात, 'महाराष्ट्रात पेशवाईच्या म्हणजे ब्राह्मणी सत्तेच्या पुनर्घटनेशिवाय ब्राह्मण क्रांतिकारकांच्या डोक्यात, मस्तकात दुसरे वेडच नव्हते. आजही ते नाहीसे झालेले नाही. (हे सावरकरांना उद्देशून आहे.) किंचित स्पष्टच बोलायचे तर, चालू घडीला हिंदुत्वनिष्ठेच्या मुखवट्याखाली चाललेल्या या ('मी परत येईन' छापाच्या) लोकांच्या उघड–गुप्त खटपटी, या ब्राह्मणी सत्तेच्या प्रस्थापनेसाठी आहेत. ही दीर्घ सूचनेची मख्खी महाराष्ट्रातला तमाम ब्राह्मणेतर वर्ग पुरेपूर ओळखून आहे. (तथापि, 'भाजप' बरोबरच्या युतीत 'शिवसेना'च्या प्रगतीची २५ वर्षं सडली, हे उद्धव ठाकरे यांच्या लक्षात येण्यास २०१४ची विधानसभा निवडणूक यावी लागली.) महात्मा गांधींच्या राजकारण प्रवेशापूर्वी हे लोक स्वतःला 'राष्ट्रीय' म्हणवीत असत. यांचा पक्ष राष्ट्रीय, सभा राष्ट्रीय, पुढारी राष्ट्रीय, व्याख्यान राष्ट्रीय; यांची वर्तमानपत्रे, कीर्तने, ग्रंथ, गणपतीचे मेळे, सर्व काही राष्ट्रीयच राष्ट्रीय! आता नेमका तोच 'राष्ट्रीय' शब्द शिवी म्हणून काँग्रेसी राजकारणाला वापरून ते आता 'हिंदुत्वनिष्ठ' म्हणून मिरवण्यात धन्यता मानतात! स्वजातीच्या अभिमानावर लांबरुंद तणाव्याची विश्वबंधुत्वाची शालजोडी पांघरून इतर जनांना भुरळविण्याच्या कामात या लोकांचा हात कोणीही धरू शकणार नाही!' (वाचा : 'प्रबोधन'कार ठाकरे लिखित 'हिंदवी स्वराज्याचा खून' (प्रकाशन : १९२२) व 'प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी' (१९४८) हे ग्रंथ.) या पार्श्वभूमीवर संघ परिवाराचे हिंदुत्व तपासायला हवे!

## संघाचे सावरकर तोंडी लावण्यापुरते

**कोणते** हिंदुत्व योग्य आणि कोणते अयोग्य, याबाबत सरसंघचालक मार्गदर्शन करतात. मात्र, त्यासाठी कर्मकांडी हिंदुत्वाला भट-ब्राह्मणसह नाकारणाऱ्या सावरकरांच्या हिंदुत्वाचा दाखला म्हणून देत नाहीत. महात्मा फुले, 'प्रबोधन'कार ठाकरे यांची नावं जीभ झडून पडण्याच्या भयास्तव ते घेत नसावेत, हे समजू शकते. परंतु, जातीनिशी ब्राह्मण्याचे श्राद्ध घालणाऱ्या सावरकरांना तोंडी लावण्यापुरतेच वापरण्याचे कारण काय? संघाला जर अस्सल हिंदुत्वाचं मूल्य प्रस्थापित करून हिंदुराष्ट्र निर्माण करायचे होतं, तर हिंदू-हिंदुत्ववादाऐवजी 'जनसंघा'ला 'एकात्म मानवता' वादाच्या आणि 'भाजप'ला 'गांधीवादी-समाजवादा'च्या पाळण्यात टाकण्याची गरज काय होती? या पक्षांना थेट 'हिंदुत्व'वादी अवतारात प्रकट करण्याची हिंमत संघाने का दाखवली नाही? याउलट थेट हिंदुत्व सांगणाऱ्या, पक्ष-संघटना ठसठशीत 'हिंदू' कुंकू लावून चालवणाऱ्या सावरकरांना नाकारण्याचा आणि सोयीप्रमाणे वापरून बदनाम करण्याचा उद्योग संघ परिवाराने केला आहे. 'भारतरत्न'साठी सावरकरांचं नाव चर्चेला आणायचं आणि त्यांची 'माफीवीराची बदनामी' नव्या पिढीपर्यंत पोहोचवायची, हा खेळ गेली २५ वर्षं सुरू आहे. त्यात सावरकरांना पुढे करून हेडगेवार-गोळवलकर-देवरस या सरसंघचालकांच्या दिव्य विचारधनाचं संरक्षण केलं जातं. सावरकरांचं हिंदुत्व हे ग्रंथप्रामाण्य नाकारीत, आधुनिक हिंदुराष्ट्राचा पुरस्कार करणारं आहे. तरीही गोळवलकर गुरुजींच्या लेखी सावरकर 'बाटगे हिंदू' ठरले! त्यांनीच सावरकरांच्या 'अखंड भारत'च्या लढ्याला विरोध केला. त्यांनीच 'लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या' असा संदेश साहित्यिकांना देणाऱ्या सावरकरांना 'ब्रिटिश सरकार'चे 'रिक्रूटवीर' म्हटलंय. याउलट, १९४५-४६च्या फाळणी प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या निवडणुकीत संघ परिवार 'काँग्रेस'बरोबर होता. 'संघ-भाजप' परिवाराचा 'हिंदुत्व'वाद हा स्थापनेपासूनच फसवा आहे. तो सत्याचा नाही, तर सत्तेचा भुकेला आहे.



## सत्तेसाठी हिंदुत्व सोयीसाठी भारतीय

**'संघ स्वयंसेवक'** नरेंद्र मोदी हे देशाचे दोनदा प्रधानमंत्री झाल्याने संघकार्याचं मोठं कौतुक होतंय. ती सत्तेची किमया आहे. मात्र, ही सत्ता हिंदुत्वाचं दर्शन घडवून नाही, तर 'अच्छे दिन'च्या भूलथापा मारून आणि 'सर्जिकल स्ट्राइक'ची 'हवा' करून प्राप्त झालीय. या 'छाछू'गिरीची जाणीव भारतीय जनतेला झालेली आहे. त्याचे परिणाम संघावर उलथू नयेत, यासाठी 'भाजप' सत्ताधारी उन्मादी हिंदुत्वापेक्षा, संघाचं हिंदुत्व कसं वेगळं आहे, ते दाखवणारी शाब्दिक कसरत सरसंघचालकांच्या भाषणातून दिसते. हा भक्त मंडळींना आत्मवंचनेच्या धोक्यात टाकून सटकण्याचा प्रकार आहे. त्यासाठी संघाने पळवाटा ठेवूनच आपल्या परिवाराचा वाढ-विस्तार केलाय. त्यासाठी बाता हिंदूहिताच्या मारायच्या; पण भारतीय जनतेची लाथ टाळण्यासाठी संस्था-संघटनांच्या नावात 'हिंदू' येऊ नये, याची खबरदारी घेतलीय. यासाठीच 'हिंदू जनसंघ' ऐवजी 'भारतीय जनसंघ' आणि 'हिंदू जनता पक्ष' ऐवजी 'भारतीय जनता पक्ष' अशी नामकरणं झालीत. 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषद', 'भारतीय किसान सभा', 'भारतीय मजदूर संघ' या लोकांत काम करणाऱ्या पक्ष-संघटनांना 'भारतीय'करणाचा मळवट फासलाय. अपवाद 'विश्व हिंदू परिषद'चा! ती संघ कार्यासाठी विदेशातल्या हिंदूंच्या मदतीचा ओघ खेचण्यासाठीची युक्ती आहे ! अशा युक्त्यांवर युक्त्या वापरायच्या आणि वर हिंदू-हिंदुत्व, हिंदुराष्ट्राच्या नावाने ओरड करायची. हा संघाचा कावा ना संघ स्वयंसेवकांना कधी कळला; ना गाढवाचे गोविंदराव झालेल्यांना समजला! अहंकाराला ज्ञान समजणे; आम्ही सांगतो तेच खरे; देशाचे-हिंदूंचे काही होवो, संघ (नव्हे संघ नेते) टिकला पाहिजे, एवढ्यापुरतेच संघाचे हिंदुत्व मर्यादित आहे. देशातील हिंदूंनी आपल्या प्रचंड त्यागाने 'संघ-भाजप'ला सत्ता दिलीय. पण हे 'सेवक' होण्याऐवजी 'धनी' झालेत. त्याच मिजाशीत अर्थतज्ज्ञांना डावलून अर्थव्यवस्था खिळखिळी करणारी 'नोटाबंदी' मोदींनी लादली. विरोधी पक्षांच्या राज्यातील सत्तेचं नाक दाबण्यासाठी 'जीएसटी'चा चाप लावला. या दोन्ही 'तुघलकी' निर्णयांतून शेतकरी, व्यापारी, लघुउद्योजकांना आणि तिथल्या कष्टकऱ्यांना उद्ध्वस्त केल्यावर; चुकीच्या पद्धतीने 'कोरोना-लॉकडाऊन' लादून देशाची अर्थव्यवस्थाच पार खड्ड्यात नेली. स्वयंसेवकाच्या या नुकसानकारी मनमानीचा समाचार घेण्यासाठी, हिंदुत्वाची उठाठेव करणाऱ्या सरसंघचालकांची दातखीळ कधी सुटणार? स्वयंसेवकाचीच सत्ता असताना देशाची, हिंदूंची प्रगती किती झाली, ते सांगण्यास संघाचे 'थिंक टँक' तयार नाहीत. कारण, याबाबत सत्य सांगायचे तर, चुकांची यादी भलीमोठी आहे. ती देशाचा शक्तिपात आणि हिंदूंचा भ्रमनिरास करणारी आहे. या काळातच शत्रुत्व असलेल्या चीन-पाकचे प्रमुख प्रधानसेवकाचे मित्र झालेत; तर जाब विचारणारे स्वकीय देशद्रोही झालेत. अशा खोट्या हिंदुत्वाची ओझी वाहणारी गाढवं, रावणासारख्या दशमुखी संघाच्या विविध संस्था-संघटनांच्या माध्यमातून 'भक्त' म्हणून वावरतात. 'संघ-भाजप' परिवाराची सोवळी फाडणाऱ्यांच्या अंगावर जातात. त्यांना त्यांचा गाढवपणा समजावून सांगण्यातच खरं हिंदुत्व आहे. तेच भारताची लोकशाही सशक्त आणि मजबूत करणारं राष्ट्रकार्य आहे! ■

# गुगल पे सोपा वे

# QR वापरा! चित्रलेखा हक्काचा करा!










## माहिती-ज्ञान सर्वोच्च दान!

## तुमचा चित्रलेखा १०००जणांना द्या!

{ **'कोरोना-लॉकडाऊन'** सुरू झाल्यापासून गेले ४ महिने, दर आठवड्याला e-चित्रलेखा अंक आपण विनामूल्य वितरित करीत आहोत. हे काम खर्चिक आहे. त्याचा भार हलका करण्यासाठी ज्यांना शक्य आहे, त्यांनी पुढीलप्रमाणे सहकार्य करावे. किमान वार्षिक वर्गणी भरा! आपल्या मित्र परिवारालाही सांगा. अनेकांनी वर्गणी भरुन व देणगी देऊन सहकार्य केले आहे. **त्यांचे आभार!** }

ज्ञानेश महाराव
*संपादक*
*साप्ताहिक चित्रलेखा*

## आपण सहकार्य कसे कराल?

- रुपये **१००पासून** कितीही रक्कम व्यक्तिगत/सामूहिक वा संस्था/ संघटनेच्याद्वारे 'देणगी' म्हणून 'चित्रलेखा'च्या खाली दिलेल्या बँक अकाउंटमध्ये जमा करावी.
- 'डिजिटल-e चित्रलेखा' **सहा महिन्यांची रु.३५० वा वार्षिक रु. ७०० वर्गणी** भरावी.
- 'e-चित्रलेखा'त जाहिरातीसाठी **विशेष सवलत** आहे. त्याचा लाभ घ्यावा.

या तीनही पर्यायांसाठी-

'चित्रलेखा'चा HDFC बँक अकाउंट तपशील -

- **Ac name** : **Chitralekha**
- **Ac no** : **00192320002432**
- **IFSC code** : **HDFC0000019**
- **Address** : The amaltas co. op. hsg. Soc ltd, Juhu-Versova link road, Andheri (West), Mumbai - 400 053

आपण बँकेत वरील अकाउंटवर रक्कम भरल्यावर जी पावती मिळेल, ती **09820649692** या **Whats app** नंबरवर फॉरवर्ड करा/पाठवा.

सोबत, आपल्याला 'चित्रलेखा' नियमित मिळण्यासाठी आपला e-mail ॲड्रेस/ Whats app नंबर द्या. तुमच्या नावासह निवासाचा पत्ताही द्या.

◻ अधिक माहितीसाठी संपर्क : अभिजित संते- **07977855644 / 09322222145**

# रोजगाराच्या लढ्यासाठी संघटनशक्ती एकत्र

**देशभर** रोजगाराचा प्रश्न 'कोरोना लॉकडाऊन'पूर्वीच गंभीर बनला होता. 'कोरोना लॉकडाऊन'मुळे अर्थव्यवस्थाच अडचणीत आल्याने रोजगाराच्या प्रश्नाने सर्वोच्च टोक गाठले आहे. महाराष्ट्रात त्याची प्रतिक्रिया तीव्रतेने उमटली आहे.

परिणामी, राज्यभर बेरोजगार तरुण-तरुणींच्या आणि विद्यार्थ्यांच्या संघटना आपापल्या प्रश्नांसाठी लढत आहेत. कुणी प्राध्यापक भरती सुरू करावी म्हणून; तर कुणी शिक्षक भरतीची रखडलेली प्रक्रिया मार्गी लागावी म्हणून; तर कुणी स्पर्धा परीक्षा वेळेवर व्हाव्यात, म्हणून आंदोलन करीत आहेत.

काही ठिकाणी 'कोरोना लॉकडाऊन'च्या काळात मोठ्या संख्येने कंत्राटी कर्मचाऱ्यांना नोकरीतून तडकाफडकी कमी करण्यात आले. ते आणि विविध कंपन्यांमधील कामगार, रिक्षाचालक, सुरक्षारक्षक, मजूर हे देखील त्यांच्या त्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन करीत आहेत. मजुरापासून ते 'आयएएस'चे परीक्षार्थींपर्यंत सगळेच रोजगाराच्या प्रश्नांवर लढा देत आहेत.



या साऱ्या संघटनांना एकत्र करून रोजगाराचा लढा तीव्र करण्यासाठी पुण्यात नुकतीच 'रोजगार हक्क राज्य कृती समिती'ची स्थापना करण्यात आली आहे. रोजगाराच्या प्रश्नांवर आता एक-एकटे न लढता एकमेकांना साथ देणे, किमान समान कार्यक्रम निश्चित करून त्याचा पाठपुरावा करणे, यासाठी ही समिती कार्यरत राहणार आहे.

या एकत्रित लढ्यासाठी राज्यातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींची 'ऑनलाइन बैठक' नुकतीच पार पडली. या बैठकीत सगळ्यांनी एकत्र येऊन रोजगाराच्या प्रश्नांचा लढा अधिक तीव्र करण्यावर सहमती दर्शवली.

या बैठकीला 'इनोव्हेशन फाउंडेशन'चे अध्यक्ष **कल्पेश यादव**, 'डीटीएड/बीएड असोसिएशन'चे राज्य अध्यक्ष **संतोष मगर**, 'नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समिती'चे राज्य समन्वयक **प्रा. सुरेश देवढे व प्रा. प्रमोद तांबे**, 'कंत्राटी कर्मचारी अभियान'चे अध्यक्ष **प्रमोद चिंचुरे**, 'युक्रांद'चे उपाध्यक्ष **कमलाकर शेटे**, 'एनएसयुआय'चे पदाधिकारी **सतीश पवार**, 'पोलीस भरती संघटना'चे **युवराज राठोड**, 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, माजी विद्यार्थी संघटना'चे **श्रीकांत मिश्रा, विष्णू नाझरकर, ज्ञानेश भुकेले, राजेंद्र भोईवार**, 'जागल्या वेबपोर्टल'चे संपादक **दीपक जाधव** आदी उपस्थित होते.

'ही 'रोजगार हक्क राज्य कृती समिती', वरील सर्व संघटनांना एका समान धाग्याने एकत्र आणू इच्छिणाऱ्या विचारमंचाचे काम करेल,' अशी माहिती देऊन समितीचे समन्वयक **दीपक जाधव** म्हणाले, 'या समितीमध्ये सर्वच राजकीय विचारधारेचे कार्यकर्ते सहभागी होत असले तरी, समितीचे स्वरूप मात्र पूर्णतः अराजकीय असेल, असा निर्णय घेण्यात आला आहे.'

समन्वयक **कल्पेश यादव** म्हणाले,'आम्ही सर्वचजण आपापल्या संघटनेच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. मात्र शासनाकडून 'कोरोना'ची साथ, निधी उपलब्ध नाही अशी कारणे सांगून टोलवाटोलवी केली जात आहे. वस्तुतः शासनाला या कारणांचे केवळ निमित्त मिळाले आहे. 'कोरोना'ची साथ नव्हती तेव्हाही कुठल्याही शासनाने बेरोजगारांच्या प्रश्नांबाबत गांभीर्याने लक्ष दिलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आता सगळ्यांनी एकत्र येऊन आणखी मोठ्या स्तरावर बेरोजगारांच्या प्रश्नांचा लढा घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले आहे.

किमान समान कार्यक्रमावर एकत्र काम करण्याचे समिती मार्फत ठरविण्यात आले आहे!'

राज्य शासनाने बेरोजगारीवर विशेष अधिवेशन बोलवावे; या अधिवेशनात एकूणच सर्व भरती प्रक्रियेवर चर्चा व्हावी आणि रखडलेली नोकरभरती कधी सुरू करणार? स्पर्धा परीक्षा निश्चित वेळापत्रकानुसार पार पाडण्यासाठी शासन काय पावले उचलणार? रोजगार वाढविण्यासाठी शासन काय प्रयत्न करत आहे? बेरोजगारी हटविण्यासाठी तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना काय केल्या जाणार आहेत? या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, अशी मागणी शासनापुढे ठेवली जाणार आहे.

या 'रोजगार हक्क राज्य कृती समिती'मध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींच्या संघटनांचे स्वागत आहे. त्यांनी पुढील समिती समन्वयकांशी संपर्क साधावा.

दीपक जाधव ९९२२२०११९२, कल्पेश यादव ९६२३३३७७७७, संतोष मगर ९८९०८१६८९४, प्रा. सुरेश देवढे ८१४९९४४२३९०, प्रमोद चिंचुरे ९९६०४३३०५१.

■ रवींद्र पिंपळकर (पुणे)

# इबोला पासून नायजेरियाला वाचवणाऱ्या डॉक्टरच्या सन्मानाबद्दल अबोला

'इबोला' हा साथीचा रोग गेल्या अनेक दशकांपासून आफ्रिका खंडात धुमाकूळ घालतोय. २०१४मध्ये नायजेरियात आलेल्या 'इबोला'ला डॉक्टर अमेयो अडाडेवोह यांनी धमक्या व दबावाची फिकिर न करता रोखलं आणि देशाला वाचवलं. या सेवेतच त्यांनाही 'इबोला' होऊन त्यांचा मृत्यू झाला. २७ ऑक्टोबरला त्यांचा जन्मदिवस होता. त्यानिमित्त त्यांच्या धाडसी रुग्णसेवेची आठवण.

रेणुका कल्पना



२० ऑक्टोबर २०१४ ला जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच 'डब्लूएचओ'नं नायजेरिया या देशाला 'इबोला मुक्त' म्हणून घोषित केलं. कारण तेव्हा शेवटचा पेशंट सापडल्यानंतर पुढचे ४२ दिवस एकही नवा रुग्ण सापडला नव्हता. नायजेरियन लोकांसाठी ही फार फार आनंदाची गोष्ट होती. पण तरीही नागरिक दु:ख व्यक्त करत होते.

संपूर्ण आफ्रिका खंडाच्या तुलनेत नायजेरियात 'इबोला'चे फारच थोडे पेशंट निघाले. तरीही नागरिक हातात मेणबत्त्या आणि पोस्टर घेऊन रस्त्यावर उतरले होते. कशासाठी? श्रद्धांजली वाहण्यासाठी! कुणाला? 'इबोला'च्या पहिल्या पेशंटला हॉस्पिटलमध्येच रोखून, हा भयानक साथरोग देशभरात पसरण्यापासून वाचवणाऱ्या नायजेरियन डॉक्टर अमेयो स्टेला अडाडेवोहयांना!

**भयानक साथीची सुरवात**

गेल्या अनेक वर्षांपासून 'इबोला' आफ्रिकन देशांना त्रास देतोय. 'कोरोना'प्रमाणेच ताप, सर्दी, खोकला, फुप्फुसांना सूज अशी लक्षणं 'इबोला'मध्ये दिसतात. मात्र, 'कोरोना'पेक्षा हा विषाणू अधिक घातक असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. सर्दी, खोकला यांच्या मार्फत 'इबोला' पसरतोच.




डॉक्टर अमेयो यांच्या कार्यस्मृती जागती ठेवण्यासाठी त्यांच्या वाढदिवशी नायजेरियात असे मोर्चे निघतात.

पण त्यासोबतच लघवी, विष्ठा, रक्त, थुंकी, घाम आणि वीर्यासारख्या लैंगिक स्रावांमधूनही 'इबोला'चे विषाणू इकडून तिकडे पसरतात. आजारी पडलेल्या माणसाच्या खूप जवळून संपर्कात येणाऱ्या कुणाच्याही शरीरात हा 'व्हायरस' अगदी सहज पसरतो.

'डब्लूएचओ'ने दिलेल्या माहितीनुसार, १९७६मध्ये या आजाराचा पहिला पेशंट सापडला. तेव्हापासून अनेकदा 'इबोला'च्या साथी आफ्रिकेत पसरल्या आहेत. २०१३ला गिनी देशातल्या एका लहानशा गावातल्या एका लहान मुलामुळे या साथीचा पुन्हा प्रसार सुरू झाला. घराच्या मागच्या अंगणातल्या झाडाच्या ढोलीत हा मुलगा खेळायला जात असे. त्या ढोलीत वटवाघळांचा वावर होता. तिथून 'इबोला'चा विषाणू या लहानग्याच्या शरीरात आला आणि बघता बघता संपूर्ण गाव, शहर आणि एका देशातून दुसऱ्या देशात हा 'व्हायरस' प्रवास करू लागला.

डिसेंबर २०१३ पासून हा साथरोग सुरू झाला असला, तरी मार्च २०१४मध्ये तो 'इबोला' असल्याचं शास्त्रज्ञांच्या लक्षात आलं. २०१६ पर्यंत 'इबोला' संपूर्ण आफ्रिका खंडात धुमाकूळ घालत होता. त्याचा मृत्युदरही ५० टक्के इतका जास्त होता. जगाच्या इतिहासातली ही सगळ्यात भयानक साथ मानली जाते.

### आणि इबोला आयुष्यात घुसला

२०१३ला या 'व्हायरस'चा जिथे उगम झाला, त्या गिनी शेजारीच लायबेरिया हा देश आहे. या देशातून ॲड. पॅट्रिक सॉयर हे 'अम्बॅसिडर' म्हणजेच 'राजदूत' म्हणून नायजेरियात आले. नायजेरियाची राजधानी 'कालाबार'मध्ये त्यांना कसल्याशा 'कॉन्फरन्स'ला हजेरी लावायची होती. लागोस या नायजेरियामधल्या आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या राज्यातल्या आयकेजा विमानतळावर सॉयर यांचं विमान उतरलं. विमानातून बाहेर आल्यावर एअरपोर्टवर बॅग वगैरे घेताना सॉयर कोसळले. त्यांना प्रचंड थकवा जाणवत होता. अंगात तापही होता.

त्यांची प्रकृती बरी नसल्यानं विमानतळावरच्या अधिकाऱ्यांनी आपल्याच गाडीतून त्यांना लागोसमधल्या 'फर्स्ट कन्सल्टण्ट हॉस्पिटल'मध्ये भरती केलं. तिथल्या प्रमुख डॉक्टर **अमेयो स्टेला अडाडेवोह** होत्या. अशाप्रकारे 'इबोला' त्यांच्या आयुष्यात घुसला. त्या २१ वर्षं तिथे काम करत होत्या. शास्त्रज्ञ असणाऱ्या वडलांकडून आणि आजोबांकडून प्रेरणा घेऊन त्या तिथे कामाला लागल्या होत्या.

नायजेरियातल्या बहुतांश लोकांना त्या माहीत होत्या. त्यांच्याकडून उपचार मिळावेत म्हणून अनेक लोक 'फर्स्ट कन्सल्टण्ट हॉस्पिटल'मध्ये यायचे. त्यासुद्धा कधीही पेशंटच्या अडीनडीला धावून जायचा. स्वतःच्या मर्यादेपलीकडे जाऊन रात्री अपरात्रीही पेशंटच्या घरी जाऊन 'ट्रीटमेंट' द्यायच्या.

### पीपीई किटही नव्हते

त्यांच्या हॉस्पिटलमध्ये सॉयर 'अडमिट' झाले तेव्हा त्यांच्यावर मलेरियाचे उपचार सुरू करण्यात आले. आपल्याला नेमकं काय होतंय याची नीट माहिती ते देत नव्हते. पण डॉक्टर अमेयो यांना त्यांच्या त्वचेवर रक्तासारखे डाग दिसले. शिवाय ते लायबेरियावरून प्रवास करून आलेत, हे कळालं. त्यावरून सॉयर यांना 'इबोला'चा संसर्ग झालेला असू शकतो, याची त्यांना शंका आली. लगेचच त्यांनी त्यांचं रक्त तपासणीसाठी पाठवलं आणि त्यांचा 'रिझल्ट पॉझिटिव्ह' आला.

'इबोला'शी लढण्यासाठी नायजेरियन सरकारनं कुठलीच तयारी




डॉक्टर अमेयो यांच्या कार्यस्मृती जागती ठेवण्यासाठी त्यांच्या वाढदिवशी नायजेरियात असे मोर्चे निघतात.

केलेली नव्हती. डॉक्टर अमेयो यांच्या हॉस्पिटलमध्ये वेगळा 'इबोला वॉर्ड'ही नव्हता आणि सॉयर उपचारासाठी आले तेव्हा 'पीपीई किट'ही नव्हते. खरंतर सॉयर यांना 'लिबेरियन सरकार'ने प्रवास करण्याची परवानगी नाकारायला हवी होती. कारण आपण 'इबोला' झालेल्या लोकांच्या संपर्कात आलो आहोत, हे सॉयर यांना आधीच माहीत होतं. तशी माहिती त्यांनी सरकारला दिली होती. तरीही 'लिबेरियन सरकार'ने त्यांना नायजेरियात पाठवलं होतं.

### अपहरणाचे आरोप

एवढी मोठी चूक करूनही 'लिबेरियन सरकार' आणि सॉयर हे अमेयो यांनाच दमदाटी करत होते. कारण सॉयर हे 'इबोला'ग्रस्त असल्याने आणि त्यांच्यामुळे देशभर साथरोग पसरण्याचा धोका असल्याने ते पूर्ण बरे झाल्याशिवाय त्यांना हॉस्पिटलबाहेर सोडणार नाही, अशी ठाम भूमिका अमेयो यांनी घेतली होती. मात्र आपलं काम पटकन व्हावं, याची काळजी असणाऱ्या 'लिबेरियन सरकार'ने त्यांच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी 'सॉयर यांचं अपहरण करून त्यांना जबरदस्तीने कोंडून ठेवलंय,' असे आरोप सुरू केले. 'सॉयरना सोडलं नाही तर अमेयो यांच्या 'फर्स्ट कन्सल्टण्ट हॉस्पिटल'ची बदनामी करू,' अशा धमक्याही दिल्या गेल्या. खुद्द सॉयरही हॉस्पिटलमध्ये शांत बसून नव्हते. सलाईन आणि इतर नळ्या काढून रक्त सांडव, आरडाओरड कर असा त्यांचा उपद्व्याप चालला होता. तरीही अमेयो यांनी त्यांना हॉस्पिटलमधून जाऊ दिलं नाही.

### क्वॉरंटाईन सेंटरची दुर्दशा

हॉस्पिटलमध्ये भरती झाल्यानंतर पाचव्या दिवशी सॉयर यांचा मृत्यू झाला. त्यानंतर लगेचच हॉस्पिटलमधल्या लोकांची तपासणी करण्यात आली. त्यात डॉ. अमेयो आणि इतर ११ कर्मचारी 'इबोला' पॉझिटिव्ह असल्याचा रिपोर्ट आला. या सगळ्यांना पुढचे २१ दिवस 'क्वॉरंटाईन'मध्ये काढायचे होते.

सरकारने उभारलेली 'क्वॉरंटाईन सेंटर' ची व्यवस्था अपुरी होती. देशासाठी जिवाची बाजी लावणाऱ्यांसाठी सरकारनं चांगली सोय करणं अपेक्षित होतं. शेवटी नाइलाजाने डॉ. अमेयो घरीच 'क्वॉरंटाईन' झाल्या. दोन दिवसांतच त्यांना 'इबोला'ची लक्षणं जाणवू लागली. प्रचंड थकवा आला. रोजची कामं त्या हळूहळू करू लागल्या. त्यांच्या नवऱ्याला हा फरक जाणवला. लगेचच त्यांची रवानगी सरकारी 'क्वॉरंटाईन सेंटर'मध्ये झाली. तिथे काही दिवसांतच त्यांची प्रकृती बिघडली आणि त्या 'कोमा'त गेल्या. पुढच्या काही तासांतच; १९ ऑगस्ट २०१४ला त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यासोबतच लागण झालेल्या ११ जणांपैकी ७ जण मृत्युमुखी पडले.

### 'कोरोना' कुणी थांबवू शकलं नाही

डॉ. अमेयो यांच्या कणखरपणामुळे १२ पेशंट आणि ८ मृत्यू घेऊन नायजेरियातला 'इबोला' फार पसरण्यापासून थांबवता आला. त्या साथरोगतज्ज्ञ वगैरे नव्हत्या किंवा मोठ्या शास्त्रज्ञही नव्हत्या. पण अचूक निदान करण्याच्या त्यांच्या ज्ञानामुळे नायजेरियाचं मोठं नुकसान थांबवता आलं. नायजेरियातला 'इबोला' संपून ६ वर्षं उलटलीत. मात्र, आज २०२०मध्ये नायजेरियामधला 'कोरोना' थांबवायला डॉ. अमेयो यांच्यासारखं कुणी नाही. नायजेरियात एकूण ५० हजार जणांना 'कोरोना'चा संसर्ग झालाय. त्यातले निदान हजार पेशंट मरण पावलेत.

अशा आणीबाणीच्या परिस्थितीत काम करणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांचा गौरव केला जातोय. मात्र 'कोरोना'पेक्षा कितीतरी पटीने भयंकर असणाऱ्या 'इबोला'ला स्वतःच्या अंगावर ओढून देशाला वाचवणाऱ्या डॉ. अमेयो यांचा गौरव करण्याचा शहाणपणा तिथल्या सरकारला अजूनही सुचलेला नाही. त्याविषयी तिथे कसलीही चर्चा होत नाही.

२१ दिवस, ६०० जणांचा स्टाफ आणि दहा हजारपेक्षा जास्त पेशंटचे आभार...

# अजब हॉस्पिटलची गजब कहाणी





खास 'कोविड-१९' च्या रुग्णांच्या उपचारासाठी  तयार केलेलं भारतातील पहिल्या कोविड 'फिल्ड हॉस्पिटल'मध्ये बऱ्या झालेल्या रुग्णांची संख्या दहा हजारपेक्षा जास्त आहे. या यशात महाराष्ट्र राज्य सरकार आणि ज्यांनी मुंबईसह इतर ठिकाणी 'चिकित्सा केंद्र' आणि 'कोविड केअर सेंटर' उभारली त्यांचा मोठा वाटा आहे.

केतन मिस्त्री (मुंबई)

मुंबईतील वांद्रे येथील 'एमएमआरडीए' (शहरातील विकासासाठी अनेक योजना राबवणारी 'मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट ऑथोरिटी')चं मैदान जंगी राजकीय सभा किंवा मोठ्या निवडणूक सभेसाठी वापरलं जातं. 'बीकेसी' (बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स) ग्राऊंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मैदानात 'पॉलिटिकल रॅली'मध्ये अनेक आश्वासनं दिली जातात. याच मैदानात



गेल्या सहा महिन्यांपासून 'कोरोना'च्या रुग्णांवर मोफत उपचार केले जात आहेत. मार्च-एप्रिल महिन्यांत जगभरात 'कोरोना'ने हाहाकार माजवला असताना, इथे एक मोठं 'कोविड केअर सेंटर' उभारण्याचं ठरलं होतं. हे 'कोविड केअर सेंटर' किंवा 'फिल्ड हॉस्पिटल' फक्त २१ दिवसांत तयार करण्यात आलंय. म्हणजे, मैदानाची साफसफाई, खडकाळ जमीन सरळ करण्यापासून ते हॉस्पिटल उभारून पहिल्या 'कोरोना पेशंट'ला ॲडमिट करण्याचा काळ फक्त २१ दिवस!

२५ मे रोजी येथे पहिला 'कोविड पेशंट' ॲडमिट करण्यात आला. त्यानंतर



डॉ. अजय ठक्कर : **चीनसारखा देश जर दहा दिवसांत हॉस्पिटल बनवत असेल तर आपण का नाही?**

आतापर्यंत, म्हणजे २५ ऑक्टोबरपर्यंतच्या ५ महिन्यांत तिथून १० हजारपेक्षा जास्त 'कोविड पेशंट' बरे होऊन घरी गेलेत.

विशेष म्हणजे, डिसेंबर २०१९ पासून या 'व्हायरस'ने चीनमधून जगभरात पसरायला सुरुवात केली, तेव्हा न्यू यॉर्क, साओ पाऊलो (ब्राझील), बार्सेलोना (स्पेन), लोम्बार्डी (इटाली) यासारख्या अनेक शहरांमध्ये अशी मोठी 'कोविड केअर सेंटर' किंवा 'फिल्ड हॉस्पिटल' रातोरात बांधण्यात आली.

'बीकेसी' येथील 'कोविड केअर सेंटर' अर्थात 'फिल्ड हॉस्पिटल' बरोबरच मुंबईतील गोरेगाव येथील 'नेस्को' या मोठ्या 'कोविड केअर सेंटर'मध्येही 'कोरोना केअर फॅसिलिटी'अंतर्गत आठ हजारपेक्षा जास्त कोविड पेशंटनी उपचार घेतलेत. तसेच वरळीतील 'नॅशनल स्पोर्ट कॉम्प्लेक्स ऑफ इंडिया' (एनएससीआय)मधील सेंटरमध्येही अनेक पेशंट बरे झालेत.

'कोरोना'च्या उपचारासाठी तयार करण्यात आलेल्या 'बीकेसी'तील 'फिल्ड हॉस्पिटल'मध्ये आणि शहरातील इतर ठिकाणी पाच हजारपेक्षा जास्त 'कोविड बेड'ची व्यवस्था करणारे डॉ. अजय ठक्कर आणि त्यांचा तरुण मुलगा डॉ. अंकित ठक्कर यांच्याकडे



डॉ. अंकित ठक्कर : **'लॉकडाऊन'मध्ये विविध राज्यांमधून साधनसामग्री आणणं एक आव्हान होतं.**

'एमएमआरडीए'ने सहकार्य मागितलं, तेव्हा म्हणजे सहा महिन्यांपूर्वी हे काम मोठं आव्हानात्मक होतं. मुंबईजवळील ठाणे तसेच इतर ठिकाणी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा असणाऱ्या 'ज्युपिटर हॉस्पिटल'चे चेअरमन-मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अजय ठक्कर यांनी कोणतीही प्रोफेशनल फी न घेता तीन आठवड्यांत हे काम पूर्ण केलं.

**डॉ. अजय ठक्कर** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'याबाबतचं श्रेय 'एमएमआरडीए' आणि राज्य सरकारचं आहे. राज्य सरकारने 'एमएमआरडीए'च्या या 'प्रोजेक्ट'ला त्वरित मान्यता देऊन स्वीकारल्यानेच, हे शक्य झालं. राज्य सरकारने फक्त परवानगी दिलेली नाही, तर त्यासाठी लागणारं सर्व सहकार्य आणि त्यासाठीच्या सर्व परवानग्या ताबडतोब दिल्या.'

डॉ. अजय ठक्कर एप्रिल महिन्यातील शेवटच्या दिवसांबाबत सांगतात, 'प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा 'लॉकडाऊन' जाहीर करण्यामागचा एक उद्देश असाही होता, की 'कोविड'च्या उपचारासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करणे! त्यावेळी असा विचार करण्यात आला की, या खतरनाक 'व्हायरस'चं चीनमधील 'एपिसेंटर' वुहान येथे जर दहा दिवसांत असं 'फिल्ड हॉस्पिटल' तयार होऊ शकतं, तर आपल्या इथे का नाही?'

मुंबई-पुणे आणि इंदोर येथे हॉस्पिटल चालवण्याचा दीर्घ अनुभव असलेले डॉ. अजय ठक्कर पुढे सांगतात, 'जम्बो कोविड सेंटर बांधण्याचं चॅलेंज आम्ही स्वीकारलं. पहिले आठ दिवस तर आम्ही ड्रॉइंग बोर्डवर डिझाईन काढण्यात घालवले. दोन बेडमधील जागा किती असावी, इथपासून ते आंघोळीपासून इतर दिनचर्यासाठीच्या सुविधा, कचऱ्याची विल्हेवाट, २४ तास ऑक्सिजनची सुविधा, पेशंटवर सतत नजर ठेवतील अशा प्रकारे नर्सिंग स्टेशन कुठे आणि कसे ठेवावेत, 'कोविड' पेशंटना सहाय्यक ठरतील अशा मोबाईल फोनचे 'चार्जर पॉईंट' कुठे लावावेत; या सगळ्याची रूपरेषा आणि डिझाईन-नकाशे तयार करण्यातच काही दिवस गेले. त्यानंतर मैदान सपाट करून त्यावर बांधकाम करण्याचा शुभारंभ करण्यात आला.'

'ज्युपिटर हॉस्पिटल'चे सीईओ **डॉ. अंकित ठक्कर** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'आता हे सगळं आठवलं तर हे सर्व कसं काय पार पडलं, याबाबत आश्चर्य वाटतं.'

'महाराष्ट्र हेल्थ युनिव्हर्सिटी'तून 'एमबीबीएस' करणारे आणि 'लंडन स्कूल

# टीमवर्कमुळे मिळाली जम्बो सफलता! -आर. के. राजीव

**मुंबईच** नाही तर भारतातील पहिलं 'फिल्ड हॉस्पिटल' बांधण्याचा अनुभव 'चित्रलेखा'शी शेअर करत आहेत मेट्रोपोलिटन कमिशनर आर. के. राजीव–



'लॉकडाऊन'च्या सुरुवातीच्या दिवसांत मुंबईत वाढत जाणारे 'कोरोनाचे पेशंट' हे एक आव्हान होतं. मुंबई हे अतिशय गर्दीचं शहर आहे. तिथे अनेक लोक छोट्या घरात दाटीवाटीने राहतात. त्यांना 'कम्युनिटी टॉयलेट फॅसिलिटी' (कॉमन टॉयलेट) वापरावी लागते. त्यामुळे हे लोक लवकर 'व्हायरस'च्या संपर्कात येऊ शकतात. अशा लोकांसाठी सर्व साधन–सुविधा असलेले 'जम्बो कोविड केअर सेंटर्स' उभारायला सुरुवात झाली.

या काळात राज्य सरकारने 'एमएमआरडीए'वर विश्वास टाकून बांद्रा– कुर्ला येथे एक 'कोविड सेंटर' उभं करायला सांगितलं. हे सेंटर बांधताना मोठ्या अडचणींचा आम्हाला सामना करावा लागला. ठराविक दिवसांमध्ये आम्ही हे सेंटर बांधायचं तर ठरवलं. पण त्या दिवसांत हजारोंच्या संख्येने मजूर मुंबई सोडून जात होते. असं असूनही आम्ही उपलब्ध असतील, तितक्या मजुरांमध्ये आणि ठराविक दिवसांत सेंटर बांधू शकलो. यासाठी संपूर्ण टीमचे आभार मानायलाच पाहिजेत. कारण 'टीमवर्क' शिवाय इतकं मोठं काम होऊच शकत नाही. तसंच शहरातील इतर भागांमध्येही अशा 'जम्बो केअर सेंटर'मधून 'कोरोना पेशंट'चा ग्राफ दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. 'बीकेसी'तील 'कोरोना केअर सेंटर' मुंबईच नाही तर आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावीच्या जवळ आहे. त्यामुळे हे सेंटर बांधत असताना तज्ज्ञांना चिंता होती, की 'कोरोना'च्या वाढत्या 'केस'वर कशा प्रकारे ताबा ठेवता येईल? पण २४ तास जागृत असलेल्या टीममुळे चांगले परिणाम मिळाले.

या शहराला 'बीकेसी'च्या 'कोविड केअर सेंटर'ने पुन्हा उभं केलं असं म्हटल्यास अतिशयोक्ती नाही!

हे 'कोविड केअर सेंटर' तपासणीचे – टेस्टिंगचे योग्य रिपोर्ट देतं. तसेच ते अत्याधुनिक साधनं, तज्ज्ञ डॉक्टर, सेवाभावी भावनेने काम करणाऱ्या नर्स, पॅरा मेडिकल, टेक्निशियन, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफने सज्ज आहे. योग्य प्लानिंग आणि चांगल्या टीममुळे आम्ही हे काम करू शकलो, याचं आम्हाला समाधान आणि आनंद आहे.


ऑफ इकॉनॉमिक्स' मधून 'एमबीए' करणारे डॉ. अंकित ठक्कर सांगतात, 'एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात देशभरात कडक 'लॉकडाऊन' होतं. आम्हाला वेगवेगळ्या राज्यांतून अनेक वस्तूंची आवश्यकता लागणार होती. उदाहरणार्थ, पाईपातून २४ तास 'ऑक्सिजन' येत राहील असं मटेरियल हरियाणामधून आणलं. 'आयसीयू–कॅज्युअल्टी वॉर्ड'साठी जीई कंपनीचे मॉनिटर–व्हेंटिलेटर बेंगळुरू–कर्नाटकमधून आणलं. गुजरातमधून बेड तसेच १००० पेशंटसाठी ३००० युनिफॉर्म, फायर व एक्सप्लोसिव्ह परमिशन वगैरे आणलं. पण या वस्तू त्या राज्यांतून आणणं किंवा ट्रान्सपोर्टद्वारे इथपर्यंत पोहोचणं अशक्य होतं. त्यावेळी कारखाने–दुकानांना शटर उघडण्याचीही परवानगी नव्हती. पण राज्य सरकारच्या सहाय्याने ते शक्य झालं.'

हॉस्पिटलबरोबरच इथे एक अद्ययावत 'लॅबोरेटरी'ही स्थापन करण्यात आली आहे. तिथे 'एक्स–रे'पासून 'ब्लड टेस्ट'पर्यंतचे सामान आणण्या– नेण्यासाठीचं सिटी स्कॅन मशीनही बसवण्यात आलंय. बाजूबाजूला असणाऱ्या दोन 'जम्बो कोविड सेंटर' यांच्या मध्ये २४ तास 'फायर ब्रिगेड व्हॅन'ही उभी करण्यात आलीय.

संपूर्ण बांधकामानंतर या जम्बो सेंटरचा कार्यभार डीन **डॉ. राजेश डेरे** आणि सात–आठ डॉक्टरांच्या टीमकडे सोपवण्यात आला. त्यांच्यासमोर आव्हान होतं, ते जम्बो हॉस्पिटलसाठी स्टाफची भरती करण्याचं! पण यातही सफलता मिळाली.

- एकूण २००० बेड
- १००० बेडसाठी ऑक्सिजन सपोर्ट
- १०८ आयसीयू बेड
- १२ डायलिसिस बेड
- ५० पेक्षा जास्त वॉर्डसाठी ५०० पेक्षा जास्त नर्स– डॉक्टर स्टाफची २४ तास सेवा.

डॉ. अजय ठक्कर सांगतात, 'या 'जम्बो कोविड सेंटर'चं प्लानिंग करताना पेशंटच्या छोट्या–मोठ्या सुविधांबरोबरच अति पाऊस, वादळ या नैसर्गिक संकटांचाही विचार करण्यात आला होता. यामुळेच 'सायक्लोन निसर्ग' आणि अलीकडेच मुंबईत वीज गेल्याने पसरलेल्या संकटावर 'पॉवर बॅक'च्या मदतीने मात करता आली. तसं पाहता, संसर्ग रोग आपल्यासाठी नवीन नाही. पण झटपट पसरणारा 'कोरोना' हा एक नवीन संसर्गजन्य रोग आहे. त्याच्याशी सामना करणं एक नवीन आव्हान होतं. पण 'एमएमआरडीए' आणि राज्य सरकारच्या मदतीने लोकांसाठी या संकटात अशी उत्तम 'हेल्थ केअर फॅसिलिटी' तयार करण्यासाठी, वैद्यकीय क्षेत्रात असल्याने आम्हाला योगदान देता आलं याचं मोठं समाधान आहे.' ◘




# कृत्रिम बुद्धिमत्ता

## माणसाची मित्र की शत्रू?

’आर्टिफिशल इंटेलिजन्स’ म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अनेक क्षेत्र व्यापत असून तिच्यात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक होतेय. शेतीपासून स्पोर्ट्सपर्यंत आणि आरोग्यापासून इनोव्हेशनपर्यंत उपयुक्त ठरणारी ही टेक्नॉलॉजी एके दिवशी जन्म देणाऱ्या माणसालाच गुंडाळून टाकणार नाही, यासाठी आपल्या सर्वांनाच सावध राहावं लागेल.

रिपोर्ट: सुनील मेवाडा । समीर पालेजा । समीर करंबे

'गूगल' किंवा 'ॲमेझॉन' किंवा इंटरनेटवरील कुठल्याही 'सर्च इंजिन'वर काही शोधलंत, तर काही क्षणांत इंटरनेटवरील आपले तमाम प्लॅटफॉर्म म्हणजे 'जी मेल', 'फेसबुक' यासारख्या 'ॲप्लिकेशन'वर आपल्या 'सर्च'ला अनुरूप जाहिराती झळकायला लागतात. 'एआय' म्हणजे 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'ची ही कमाल असते. मुलाच्या चेहऱ्यावरून त्याला भूक लागलीय, हे आईला कळतं. तसंच 'इंटरनेट'वरील आपल्या 'ॲक्टिव्हिटी'वरून आपल्या मनात काय चाललंय, हे 'आर्टिफिशल इंटेलिजन्स' ओळखतं.

'गूगल'चा 'व्हॉईस असिस्टंट' किंवा 'ॲमेझॉन अलेक्झा' ही 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'ची दोन 'बोलकी' उदाहरणं आहेत. या यांत्रिक कन्या तुमचा शब्द झेलायला तयार असतात. मानवी मदतनीसापेक्षा हजारो (कदाचित लाखो) पटीने अधिक काम करण्याची त्यांची क्षमता असते.

शब्दांवरून चित्र तयार करणं, चित्रांना शब्दरूप देणं, परस्पर संबंध लावून माहितीचं वर्गीकरण करणं, गुंतागुंतीचा हिशेब करणं ही कामं 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'मुळे शंभर टक्के अचूक होतात. यात मानवी चुकीची शक्यता अजिबात नसते. मेडिकलपासून मिलिटरीपर्यंत आणि एज्युकेशनपासून एव्हिएशनपर्यंत कुठल्याही क्षेत्रात 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'चा वापर होऊ शकतो. आजकाल शेती क्षेत्रातही 'एआय' वापर उपयुक्त ठरतोय.

### 'एआय' म्हणजे नक्की काय?

याविषयी पुण्याच्या 'जी. एस. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग अँड टेक्नॉलॉजी'चे डायरेक्टर **डॉ. रवींद्र खराडकर** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'आपल्याला एखादा आजार झाला की, आपण एका डॉक्टरकडे जाऊन तपासून घेतो. परंतु त्या आजाराचे आणखी दोन-चार स्पेशालिस्ट असल्यास आपल्याला त्यांचा एक्सपर्टाईज मिळत नाही. परंतु या सगळ्या डॉक्टरांचा एक्सपर्टाईज आणि आपल्या आजाराची लक्षणं आपण कॉम्प्युटरमध्ये 'फीड' केली आणि त्यातून त्याने निदान करून दिलं, तर ते अधिक अचूक असणार, हे उघड आहे. विशेष म्हणजे, यासाठी आपल्याला डॉक्टरकडे जायचीही गरज नाही. हे 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'च्या मदतीने होऊ शकतं. या डॉक्टरांऐवजी आपण उदाहरण म्हणून शिक्षक घेतले, तर शिक्षण क्षेत्रात 'एआय'चा कसा फायदा आहे, हे लक्षात येईल.'

**जगप्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी** ज्याचा प्रचार करतो, ते 'ऑरकेम माय आय' हे लहानसं उपकरण 'एआय' टेक्नॉलॉजीवर चालतं. लहानशा टॉर्चच्या आकाराचं हे उपकरण अंधुक दृष्टी असलेल्या लोकांच्या चष्म्याला दांडीवर लावण्यात येतं. हे उपकरण आजूबाजूच्या गोष्टी 'स्कॅन' करून वापरकर्त्याला त्याची माहिती देतं आणि पुस्तकं-वर्तमानपत्रं वाचायलाही मदत करतं.

'एआय'च्या उपयुक्ततेचं आणखी एक उदाहरण म्हणजे 'एल्सा' हे 'ॲप'! अमेरिकेत शिकायला गेलेल्या वू वान नावाच्या विद्यार्थिनीच्या असं लक्षात आलं की, विदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे इंग्लिश उच्चार वेगळे असल्याने त्यांना अडचण येते. अमेरिकन लोकांना त्यांचे उच्चार नीट समजत नाहीत. ही गोष्ट लक्षात घेऊन वू वानने आपल्या झेव्हियर अँग्युलरा या पोर्तुगीज मित्राच्या मदतीने 'एल्सा' म्हणजे 'इंग्लिश लँग्वेज स्पीच असिस्टंट' हे 'ॲप' विकसित केलं. २०१५ मध्ये लाँच झालेल्या या 'ॲप'चे १०१ देशांत ७० लाख युजर्स आहेत.


'एल्सा कॉर्प'चे भारताचे कंट्री हेड **मानीत पारीख** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'ज्यांना थोडंफार इंग्रजी येतं, त्यांचे उच्चार सुधारणारं हे 'ॲप' आहे. 'ॲप' ओपन केल्यावर मातृभाषेचा पर्याय निवडून तुम्हाला बारा प्रश्नांची 'ॲसेसमेंट टेस्ट' द्यावी लागते. तुम्ही बोललेली उत्तरं रेकॉर्ड होतात आणि बोलण्याचा वेग, शब्दावरील जोर आणि उच्चार यांची नोंद घेऊन 'एल्सा' उच्चारशुद्धीसाठी








पिकाचं नियोजन असो की, कमजोर डोळे असणाऱ्यांना दृष्टी देणं असो, 'एआय'चा उपयोग अनेक गोष्टींसाठी होऊ शकतो. आता 'रुबिक क्यूब' सोडवणारे बुद्धिमान रोबोटही तयार झालेत.



**डू यू ट्रस्ट धिस कॉम्प्युटर?:** फिल्ममेकर क्रिस पेनने या डॉक्युमेंटरीमधून 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'चे धोके अधोरेखित केलेत.

तुम्हाला संपूर्ण प्लॅन तयार करून देतं. महिनाभर प्रॅक्टिस केल्यास तुमचं इंग्लिश नक्की सुधारतं.'

हिंदी, तमिळ, तेलुगू आणि बंगाली लोक कसे इंग्लिश उच्चार करतात, हे 'एल्सा'च्या कृत्रिम बुद्धिमत्तेला ठाऊक आहे. ते उच्चारशुद्धीसाठी 'कस्टमाईज्ड प्लॅन' तयार करून देतं. 'एल्सा'चे भारतात १,८०,००० ग्राहक आहेत. त्यातील ५०,००० 'पेड' आहेत. 'एल्सा' त्याच्यातून अडीच लाख डॉलर्स उत्पन्न कमावते.

'नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनी' (नॅसकॉम)चा ताजा अहवाल सांगतो की, 'एआय'चा वापर करणाऱ्या भारतीय कंपन्यांनी हा वापर एक युनिटने वाढवला, तरी देशाला ६७.२५ अब्ज डॉलर्सचा (१ डॉलरचा सध्याचा भाव अंदाजे ७४ रुपये) फायदा होईल. याचा अर्थ, 'जीडीपी'मध्ये अडीच टक्क्यांची वाढ होईल. 'एआय' आणि 'डेटा सायन्स'चा भारताने योग्य वापर केला, तर २०२५ पर्यंत 'जीडीपी'मध्ये थेट ४०० ते ५०० अब्ज डॉलर्सची भर पडेल. यातील ४५ टक्के व्हॅल्यू कन्झ्युमर गुड्स, रिटेल्स, कृषी आणि बँकिंग अँड इन्शुरन्स या तीन क्षेत्रांमधील असेल.

डॉ. रवींद्र खराडकर सांगतात, 'केवळ भारताची 'एआय'ची बाजारपेठ १८० दशलक्ष डॉलर्सची आहे. त्यामुळे आपल्याला 'एआय'ला टाळून चालणार नाही. प्रॉब्लेम सॉल्व्हिंग परिणामकारक करायचं असेल, तर 'एआय'शिवाय पर्याय नाही. भारतात तर अनेक क्षेत्रात आपण 'एआय'चा भरपूर वापर करू शकतो. उदाहरणार्थ, रेल्वे, लॉजिस्टिक्स, मेडिसिन, शेती, हवामान अंदाज, भाषांचा अभ्यास, शालेय शिक्षण, कोर्ट खटले अशी यादी मोठी आहे. अशा कुठल्याही क्षेत्रात कामं पटापट आणि अचूक करायची असल्यास 'एआय'ची मदत घेता येईल.'

'नॅसकॉम'ने ५००हून अधिक कंपन्यांच्या 'चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर'च्या मुलाखती घेऊन एक सर्व्हे केलाय. त्यात ६० टक्के अधिकाऱ्यांनी कबूल केलंय की, जगभरात वाढत जाणाऱ्या 'एआय'च्या वापराचा परिणाम सध्याच्या बिझनेसवर होऊ शकतो. परंतु तरीही केवळ २५ टक्के कंपन्यांनी आपल्या बिझनेसमध्ये 'एआय'चा वापर सुरू केलाय. यातील ७० टक्के कंपन्यांनी 'एआय'चा वापर त्यांच्या धंद्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरल्याचंही म्हटलंय. कदाचित यासाठीच 'नॅसकॉम'च्या 'फ्युचर स्किल्स' विभागाने भारतीय तरुणांना 'एआय'चं कौशल्य प्राप्त व्हावं, यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' या जगप्रसिद्ध कंपनीशी हातमिळवणी केलीय. या दोन्ही संस्था एकत्र येऊन २०२१ पर्यंत १० लाख तरुणांना प्रशिक्षण देणार आहेत.

'एआय'बरोबर 'मशीन लर्निंग' आणि 'डेटा सायन्स'ही त्यांना शिकवण्यात येईल. या ऑनलाईन ट्रेनिंगसाठी तज्ज्ञांकडून 'मेंटोरिंग' तसंच 'सेल्फ लर्निंग' आणि 'व्हर्च्युअल इन्स्ट्रक्टर'चीही व्यवस्था करण्यात आलीय. त्यामुळे 'एआय'चा विशिष्ट अभ्यासक्रम मानव नव्हे, तर मशीनच शिकवेल.

'लाईव्ह डेमो', 'वर्कशॉप' आणि 'असाईनमेंट'च्या माध्यमातून २० सप्टेंबरपासून विनामूल्य प्रशिक्षण सुरूही झालंय. जगभरातील अडीच लाख तरुणांना 'डिजिटल इकॉनॉमी'चा भाग बनवण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' कंपनी या प्रकारच्या प्रशिक्षण शिबिरांचं आयोजन करत आहे. 'एआय'मध्ये कौशल्य प्रतिभा विकसित करून भारताला वैश्विक केंद्र बनवण्याची दृष्टीने हे सुरू आहे.

पुढील वीस वर्षांच्या काळात ज्या नवनव्या टेक्नॉलॉजींचा आविष्कार होणार होता, त्या आता 'एआय'च्या वापरामुळे केवळ पाच वर्षांत प्रत्यक्षात येणार आहेत. तंत्रज्ञानाची क्रांती 'एआय'च्या मदतीने सोपी होणार आहे.

वेगवेगळे मेडिकल रिपोर्ट्स, एक्स-रे, इमेजेसवरून आजाराचं निदान करण्यात

## सुरुवात कधी झाली?

**१९५६** मध्ये अमेरिकेच्या न्यू हॅम्पाशायर येथील एका वर्कशॉपमध्ये गणिताचे प्रोफेसर आणि **कॉम्प्युटर शास्त्रज्ञ जॉन मॅकार्थी** सांगत होते, 'प्रॉब्लेम सॉल्व्हिंग म्हणजे समस्या सोडवण्याची मानवी क्षमता मशीनला शिकवल्यास माणसाला करावी लागणारी अनेक फुटकळ कामं मशीनकडून करून घेतली जाऊ शकतात.'



'एआय'चा जनक जॉन मॅकार्थी.

हे वक्तव्य करून त्यांनी सगळ्यांना अचंबित करणारे दोन शब्द उच्चारले : आर्टिफिशल इंटेलिजन्स.

इतिहासात या वर्कशॉपची 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'ची प्राथमिक व्याख्या आणि तत्त्वं ठरवणारी म्हणून नोंद झाली. मानवी बुद्धीकडून केल्या जाणाऱ्या गोष्टींचं अनुकरण करण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे वापरली जाणारी भाषा वापरण्यासाठी कॉम्प्युटर प्रोग्राम्स, समस्यांचं पृथक्करण करण्याची क्षमता, स्वतःहून सुधारणा-बदल करण्याची क्षमता अशा 'आर्टिफिशल इंटेलिजन्स'च्या अनेक पैलूंची चर्चा जॉन मॅकार्थी आणि त्याच्या टीमने त्यावेळी केली होती. आज या सगळ्या गोष्टी मशीनला शिकवण्यात माणूस यशस्वी झाला नसला, तरी 'एआय'चं भवितव्य उज्ज्वल आहे.



उद्योजक एलन मस्क :

'एआय' हुकूमशहा बनल्यास त्याचा अंत होणं अवघड आहे. कारण 'एआय' अमर आहे.



शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग :

'एआय' स्वतःला उत्तरोत्तर कार्यक्षम आणि अचूक बनवत जाईल आणि माणूस तिच्या स्पर्धेत टिकणार नाही.

'एआय' डॉक्टरपेक्षाही वेगवान ठरत आहेत. ट्राफिक असलेल्या रस्त्यावरून टक्कर टाळून मानवी सहजतेने मार्ग काढणारी, वेगाची मर्यादा ओळखून धावणारी 'टेस्ला'ची 'ऑटोपायलट कार' हीदेखील 'एआय'ची करामत आहे. तसंच पुढील वीस वर्षांत ४० टक्के नोकऱ्यांवर 'एआय'चा प्रभाव असेल.

### किती लेव्हल्स आहेत?

टेक्नॉलॉजी म्हणून 'एआय'च्या अनेक पायऱ्या आहेत. एका भाषेतील मजकुराचा काही सेकंदांत दुसऱ्या भाषेत अनुवाद करून देणारे कॉम्प्युटर प्रोग्राम्स, मोबाईलमध्ये माणसाबरोबर बुद्धिबळ किंवा क्रिकेटसारखे खेळ खेळणारे प्रोग्राम्स, महाकाय डेटावरून स्वतः निष्कर्ष काढणारी 'डीप लर्निंग टेक्नॉलॉजी', आदेश न दिलेली किंवा न शिकवलेली कामं स्वतः करणारी किंवा आधी न अनुभवलेली समस्या स्वतःच्या पातळीवर सोडवणारी 'मशीन लर्निंग टेक्नॉलॉजी' मानवी क्षमतेपेक्षा वरचढ ठरू लागलीय.

माणसाला करावी लागणारी मेहनतीची कमी महत्त्वाची कामं 'एआय' किंवा 'रोबोट'वर सोपवून माणसाने अधिकाधिक सर्जनशील कामात स्वतःला गुंतवावं, हा हे तंत्रज्ञान विकसित करण्यामागचा हेतू आहे. परंतु सध्या त्याचा वापर बहुतांशी ग्राहकवाद आणि राष्ट्रवादासाठी केला जातोय. बड्या कंपन्या आणि सरकारं 'एआय'च्या विकासासाठी दणादण खर्च करत आहेत. त्यातून जे हाती लागतंय, त्याचा वापर स्वार्थी पद्धतीने केला जातोय. भविष्यात कदाचित 'एआय'द्वारे साधारण मानवी बुद्धिमत्ता बाद ठरवली जाईल, असं म्हटलं जातंय.

भविष्यात ही टेक्नॉलॉजी माणसावर कसा परिणाम करेल, याविषयी तज्ज्ञ सांगतात, 'आपले सगळे व्यवहार मानवकेंद्री आहेत. माणसालाच विचारात घेऊन सगळ्याची रचना करण्यात आलीय. परंतु 'एआय'मुळे आता सगळं यंत्रकेंद्रित होत आहे. त्यामुळे माणसाला माणसाची पूर्वीसारखी गरज उरणार नाही. तो एकटा पडत जाईल. त्यामुळे

# एआय करील आवाजावरून कोरोना टेस्ट

**'एआय'चा** वापर 'कोरोना'सारख्या महामारीच्या बाबतीत कसा होऊ शकतो, याचं उदाहरण म्हणजे आवाजावरून 'कोविड'ची टेस्ट करणारं 'ॲप'. अर्थात, हे 'ॲप' अजून विकसित अवस्थेत असून

मुंबईतील गोरेगावच्या 'नेस्को कोविड सेंटर'मध्ये १ सप्टेंबरपासून संशोधनाला सुरुवात झालीय. इस्त्रायलमधील 'वोकालिस्ट हेल्थकेअर' कंपनीच्या सहकार्याने मुंबई महापालिका तयार करत असलेलं हे ॲप 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'वर आधारित आहे.

'नेस्को कोविड सेंटर'च्या इनचार्ज **डॉ. नीलम आंड्राडे** 'चित्रलेखा'ला या संशोधनाविषयी सांगतात, 'कोविड सेंटरमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांच्या आवाजाचे नमुने आम्ही 'आयपॅड'वर घेतो. यासाठी त्यांना मायक्रोफोनवर ३० सेकंद बोलायला सांगितलं जातं. रुग्णांना हिंदी, इंग्लिश, मराठी किंवा गुजराती या चारपैकी एका भाषेत वीस आकडे बोलायला सांगितले जातात. त्यांच्या खोकण्याचा आवाजही संकलित केला जातो. हा आवाजाचा नमुना लगेच 'सर्व्हर'वर जाऊन इस्त्रायलमधील कंपनीपर्यंत पोहोचतो.'



'ॲप'साठी 'बेसिक अल्गोरिदम' तयार करण्यासाठी कमीत कमी ५०० रुग्णांच्या आवाजाचे नमुने त्यांच्या 'आरटी-पीसीआर टेस्ट' तसंच 'डिटेल केस रिपोर्ट'सह इस्त्रायलमधील कंपनीकडे पाठवावे लागणार आहेत. यापैकी आतापर्यंत ३०० रुग्णांचे नमुने इस्त्रायलला पाठवण्यात आलेत. त्याबरोबर 'डिटेल केस रिपोर्ट' नसलेले १,२०० नमुनेही पाठवण्यात आलेत. उरलेले 'डिटेल केस रिपोर्ट' असलेले २०० नमुने पाठवल्यानंतर 'वोकालिस्ट हेल्थकेअर' कंपनी त्यावर संशोधन करून 'ॲप' तयार करेल.

डॉ. नीलम आंड्राडे सांगतात, 'कोरोनाचा संसर्ग झाल्यावर घशाला आणि फुप्फुसाला सूज येते. त्यामुळे आवाजावर आणि उच्छवासावर परिणाम होतो. हा परिणाम बोलण्यातून जाणवतो. आवाजातील बदलांवरून त्याला 'कोरोना' आहे का किंवा असल्यास तो किती गंभीर स्वरूपाचा आहे याचा निष्कर्ष काढता येईल. संशोधनानंतर ८० टक्के बरोबर निष्कर्ष निघाले, तर भविष्यात ही पद्धत वापरता येईल. संशोधन यशस्वी झाल्यास आवाजावरून तीस सेकंदांत कोरोनाची चाचणी होऊ शकेल.'

'एआय' वापरून 'कोरोना'शी संबंधित आणखी एक 'ॲप' बनवण्याचा प्रयोग पुण्याच्या वाघोली येथील 'जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग अँड टेक्नॉलॉजी'च्या (जीएचआरआयईटी) अक्षय तोष्णीवाल, सोहम मुनोत, हिमांशू देशमुख, सौरभ चोरडिया या विद्यार्थ्यांनी केला. 'आयबीएम' आणि 'नॅसकॉम फ्युचर स्किल्स' यांच्या वतीने आयोजित 'क्रॅक द कोविड-१९ क्रायसिस' या राष्ट्रीय स्तरावरील 'ऑनलाईन हॅकेथॉन'मध्ये या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'एआय' आधारित 'पॉवर टू व्हॉइस' या मोबाईल ॲपला दुसरा क्रमांक मिळाला.

'जीएचआरआयईटी'च्या कॉम्प्युटर विभागाच्या असोसिएट प्रोफेसर **वैशाली बाविस्कर** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'भारतात 'कोरोना'ची साथ पसरायला लागल्यानंतर अनेक शहरांतून मजुरांचं स्थलांतर सुरू झालं. हे मजूर संघटित स्थलांतर करत नसल्याने त्यांना वैद्यकीय सेवा देणं अवघड होतं. 'ॲप'च्या माध्यमातून 'स्मार्टफोन'वरून केलेल्या कॉलच्या मदतीने त्यांची वैद्यकीय माहिती गोळा करून त्यांना 'कोविड' झालाय का, लक्षणं धोकादायक आहेत का, वगैरेची माहिती देणं शक्य झालंय. हा 'डेटाबेस' सरकार किंवा डॉक्टर्सही वापरू शकत होते. हे 'ॲप' इंटरनेटशिवायही चालू शकतं, हे त्याचं आणखी एक वैशिष्ट्य आहे.'

---

समाजाचं अंतिम केंद्र कुटुंब किंवा समूह नसेल, तर व्यक्ती असेल.'

माणूस जगण्यासाठी मेंदूची मदत घेतो. परंतु संवेदना किंवा भावनांसाठी जगतो. माणसाची कार्यक्षमता त्याचा 'आयक्यू' (बुद्ध्यांक), 'ईक्यू' (भावनांक) आणि 'एसक्यू' (सामाजिक अंक) यावर अवलंबून असते. मात्र, तंत्रज्ञानाचा संबंध केवळ 'आयक्यू'शीच असतो. सोप्या भाषेत सांगायचं, तर 'एआय' केवळ उत्पादन वाढवू शकतं. गुणवत्ता सुधारू शकतं. विश्लेषण करू शकतं. परंतु 'इनोव्हेशन'साठी (नवसर्जन) 'ईक्यू' आणि 'एसक्यू'चीच आवश्यकता असते.

'मानवी बुद्धिमत्तेवर कृत्रिम बुद्धिमत्ता कधीच मात करू शकणार नाही,' असं मांडत डॉ. रवींद्र खराडकर सांगतात, 'शेवटी डॉक्टर हा तयार व्हावा लागतो. त्याला कॉलेजमध्ये जाऊन शिकण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे या गोष्टी 'रिप्लेस' होणार नाहीत. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, 'एआय' जन्माला घालणारा शेवटी माणूस आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी मेंदूपेक्षा कधीही वरचढ ठरू शकणार नाही.'

अर्थात, 'एआय' तुमच्या भावभावनाही ओळखू शकते. जाणकार सांगतात की, 'प्रत्येक माणसाचे काही पूर्वग्रह असतात.

त्यामुळे त्यांच्याकडून 'एआय'मध्ये फिट केलेले 'अल्गोरिदम'ही पूर्वग्रह असलेले असू शकतात. त्यामुळे 'एआय'च्या प्रत्येक कामात पक्षपात केला जाऊ शकतो. मात्र, या टेक्नॉलॉजीसाठी मोठ्या 'डेटा सेंटर्स'ची गरज लागेल. ती मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन करतील. त्यामुळे पर्यावरणप्रेमींसाठी ती डोकेदुखीच ठरेल. दुसऱ्या बाजूला, भविष्यात कॅन्सरची गुंतागुंतीची सर्जरी करायला सरावलेला 'रोबोट' असा विचार करू शकेल की, कॅन्सरचा समूळ नाश करायचा असल्यास कॅन्सर होण्याची शक्यता असलेल्या लोकांना ठार मारायला हवं.'

**धोकादायक तंत्रज्ञान?**

अमेरिकन **फिल्ममेकर क्रिस पेन** याने २०१८ मध्ये बनवलेल्या 'डू यू ट्रस्ट धिस कॉम्प्युटर?' या 'डॉक्युमेंटरी'मध्ये अनेक तज्ज्ञांनी 'एआय' हे अत्यंत धोकादायक तंत्रज्ञान असल्याचं म्हटलंय. या 'डॉक्युमेंटरी'मध्ये 'टेस्ला' आणि 'स्पेसएक्स'सारख्या कंपनीचा संस्थापक **एलन मस्क** म्हणतो, 'गूगल सर्च'मध्ये काही शोधायला गेलात, तर अर्धा शब्द टाईप केला नाहीत, तोच तुम्ही काय शोधताय, ते 'गूगल' ओळखतो. 'गूगल'ने डेव्हलप केलेली 'डीप माईंड टेक्नॉलॉजी' इतकी जबरदस्त आहे की, ती जगातील कुठलाही 'डिजिटल गेम' स्वतः खेळू शकते आणि एका मिनिटात गेम पूर्णही करू शकते. 'गूगल'च्या महाकाय 'डेटा सेंटर्स'च्या डेटाचा सर्वोत्कृष्ट उपयोग करण्यासाठी 'डीप माईंड'च्या 'एआय'कडे या सगळ्या सर्व्हर्सचा 'ॲडमिन ॲक्सेस' आहे. भविष्यात एका लहानशा सॉफ्टवेअरच्या अपडेटमधून 'डीप माईंड' या सगळ्या सर्व्हर्सचा कंट्रोल आपल्या ताब्यात घेऊ शकते. 'गूगल'च्या सगळ्या डेटाचा उपयोग ती आपल्या मर्जीप्रमाणे करू शकते.'

एलन मस्क म्हणतो, 'मी 'एआय'चा वापर मानवी हितासाठी करण्याच्या बाजूने आहे. परंतु 'एआय'चं नियंत्रण विशिष्ट लोकांकडे नव्हे, तर लोकशाही पद्धतीने व्हायला हवं. जगात अनेक हुकूमशहा होऊन गेले. परंतु 'एआय' हुकूमशहा बनली, तर तिचा नाश होणार नाही. कारण ती अमर आहे. 'एआय' डेव्हलपमेंट ही अब्जावधी डॉलर्सची इंडस्ट्री आहे आणि त्यात कुठलीही रेग्युलेशन नाहीत.'

एलन मस्कने 'ओपन एआय' नावाची कंपनी स्थापन केलीय. लोकोपयोगी आणि सुरक्षित 'एआय'ची निर्मिती हा तिचा उद्देश आहे. या कंपनीने 'रुबिक क्यूब' हातात घेऊन ते स्वतःच्या बुद्धीने 'सॉल्व्ह' करेल, असा रोबोट बनवलाय. 'रोबोटच्या सर्किट'मध्ये जटिल 'अल्गोरिदम' न वापरता, रोबोट चुका करत करत 'रुबिक क्यूब' सोडवायला शिकू शकतो. माणूस कोट्यवधी वर्षांच्या उत्क्रांती दरम्यान आपल्या एकेका अवयवांचा वापर कौशल्याने करायला शिकला, तशी कौशल्य रोबोटने स्वतःहून विकसित करावीत, असा एलन मस्कचा प्रयत्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी बुद्धिमत्ता एकमेकांना पूरक आणि नुकसानकारक अशा दोन्ही प्रकारची आहे.

**एआय विरुद्ध एआय**

'केम्ब्रिज युनिव्हर्सिटी'ने गेल्या वर्षी 'प्रोजेक्ट डिबेटर' नावाचा कौतुकास्पद कार्यक्रम केला होता. त्यात परस्परविरोधी युक्तिवाद करण्यासाठी 'आयबीएम'ने 'एआय' मशीन ठेवलं होतं. 'एआय मानवी जातीसाठी शाप की वरदान?' या विषयावर वादविवाद करायचा होता. तो मशीनने स्वयंसेवकांकडून मिळालेले १,१०० मुद्दे प्रोसेस करून केला. 'एआय'च्या बाजूने बोलताना मशीनने म्हटलं, 'एआय अद्भुत कार्यक्षमतेने माणसाची अनेक नेहमीची आणि सतत करायची कामं अत्यंत बारकाईने करू शकतो.' तर विरोधात युक्तिवाद करताना मशीनने म्हटलं, 'एआय रोबोट हॉस्पिटलमध्ये रुग्णांची देखभाल करायला लागेल किंवा शाळेत मुलांना शिकवायची सुरुवात करेल, तेव्हा अनेकांच्या नोकऱ्या जातील. शिवाय 'एआय' नैतिकतेच्या कसोटीवरील निर्णय घेऊ शकणार नाही. कारण नैतिकता केवळ माणसांत असू शकते.'

या 'डिबेट'नंतर ५१.२२ टक्के प्रेक्षकांनी 'एआय' ही मानवासाठी उपयुक्त टेक्नॉलॉजी असल्याचं मत व्यक्त केलं. मात्र, 'एआय'सारख्या खतरनाक टेक्नॉलॉजीवर नजर ठेवण्यासाठी अमेरिकेने 'फ्युचर ऑफ



पुण्याच्या 'जी. एस. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीयरिंग ॲंड टेक्नॉलॉजी'चे डायरेक्टर डॉ. रवींद्र खराडकर :
**मानवी बुद्धिमत्तेवर कृत्रिम बुद्धिमत्ता कधीच मात करू शकणार नाही!**



'नेस्को कोविड सेंटर'च्या इनचार्ज डॉ. नीलम आंद्राडे :
**आवाजावरून 'कोरोना' ओळखण्यासाठी ३०० नमुने इस्त्रायलला पाठवलेत.**

# आर्टिफिशल इंटेलिजन्स वापर- गैरवापर

**काही** दिवसांपूर्वी एका 'सोशल मीडिया ॲप'च्या बाबतीतील एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. हे 'ॲप' वापरणाऱ्या लाखो महिलांचे आक्षेपार्ह फोटो 'इंटरनेट'वर प्रसिद्ध झाले होते. महिलांनी 'अपलोड' केलेल्या फोटोत फेरफार करून 'हॅकर'नी हा प्रकार केला होता. यासाठी हॅकरनी 'डीप फेक टेक्नॉलॉजी'चा वापर केला होता. ही टेक्नॉलॉजी आर्टिफिशल इंटेलिजन्स (एआय)वर आधारित असते.

तंत्रज्ञानात अनेक 'चमत्कार' करणाऱ्या 'एआय'चा वापर करून गैरप्रकारही कसे करता येतात, याचा हा नमुना. त्यामुळेच सध्या 'एआय'च्या दुष्परिणामांची चर्चाही सुरू झालीय.



'एआय' वापरून एखाद्या फोटो किंवा व्हिडिओमध्ये वाट्टेल ते बदल करता येऊ शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या राजकीय नेत्याचा 'व्हिडिओ' घेऊन त्याच्या तोंडी त्याने न उच्चारलेली वाक्य, त्याने न केलेले हावभाव सहज घुसडता येऊ शकतात. ही छेडछाड इतकी हुबेहूब असते की, ती अजिबात खोटी वाटत नाही. काही दिवसांपूर्वी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या स्पीकर नॅन्सी पालोमी यांचा एक व्हिडिओ 'सोशल मीडिया'वर प्रसारित झाला होता. त्यात त्या मद्यपान करून बोलत असल्याचं भासत होतं. प्रत्यक्षात नॅन्सी यांच्या जुन्या 'व्हिडिओ'त 'एआय'च्या मदतीने बदल करून हा व्हिडिओ तयार करण्यात आला होता. तो खोटा असल्याचं उघडकीला येईपर्यंत लाखो लोकांपर्यंत पोहोचला होता.

याच प्रकारे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचाही एक फेक व्हिडिओ 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला होता. हे तंत्रज्ञान वापरून अनेक सेलिब्रिटींचे पॉर्न व्हिडिओदेखील बनवण्यात आलेत.

'एआय'च्या मदतीने शेकडो वर्षांपूर्वी मृत्यू पावलेल्या व्यक्तींचेही असे व्हिडिओ बनवता येऊ शकतात. या प्रकारे बनवलेले महान चित्रकार साल्वाडोर दाली आणि चित्रामुळे जगप्रसिद्ध झालेली 'मोनालिसा' यांचेही व्हिडिओ इंटरनेटवर पाहायला मिळतात. विशेष म्हणजे, ते त्यांच्या फोटोंवरून तयार केलेले आहेत. हेच तंत्र वापरून २०० वर्षांपूर्वीचा प्रसिद्ध शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे आणि इंग्लंडचे प्रधानमंत्री विल्यम ग्लॅडस्टोन यांच्यातील संभाषणाचाही व्हिडिओ तयार करण्यात आलाय. तर 'पायरेट्स ऑफ कॅरेबियन'वाल्या जॉनी डेपच्या चेहऱ्यावर आपल्या इम्रान हाश्मीचा चेहरा बसवण्याची करामत कुणीतरी 'डीप फेस टेक्नॉलॉजी'चा वापर करून केलीय.

'एआय'मध्ये गैरप्रकार करण्यास भरपूर वाव आहे, असं या क्षेत्रातील तज्ज्ञांचं म्हणणं आहे. भारतासारख्या देशात भविष्यात 'फेस रेकगनायझेशन' तंत्रज्ञान वापरलं जाणार आहे. या तंत्रज्ञानामुळे गर्दीतला कुठलाही चेहरा ओळखणं शक्य असतं. तसं झाल्यास माणसांच्या संचार स्वातंत्र्यावरच गदा येईल. सरकारविरोधात निदर्शनं करणंही अवघड होईल, असं 'एआय'ला विरोध करणाऱ्यांचं म्हणणं आहे. 'एआय' हे एकूणच लोकशाहीला मारक असल्याचंही म्हटलं जातंय.

### एक सावधगिरीचा इशारा

अनेकदा तुम्ही कुठल्या सुपरस्टारसारखे दिसता, तुम्ही मागच्या जन्मी कोण होतात, तुमच्या चेहरा तुमचं काय भविष्य सांगतो, असं विचारणाऱ्या किंवा 'टेन इयर चॅलेंज' देणाऱ्या 'ॲप'वर तुम्ही तुमचा फोटो अपलोड करता. ही 'ॲप' तुमच्या फोटोचा गैरवापर करू शकतात. 'डीप फेस टेक्नॉलॉजी'चा वापर करून ते फोटोशी छेडछाड करून ते प्रसारित करू शकतात. त्यामुळे या 'ॲप'पासून दूरच राहा.

लाईफ' नावाची संस्था स्थापन केलीय. 'एआय' हे सुरक्षित तंत्रज्ञान ठरून मानवजातीवर तिच्यामुळे कुठलं संकट येऊ नये, असा या संस्थेचा प्रयत्न आहे.

'एआय' आल्यास काम कमी होऊन अनेक जणांना नोकऱ्या गमवाव्या लागतील, या गोष्टीचं खंडन करताना डॉ. रवींद्र खराडकर सांगतात, 'एखाद्या गोष्टीकडे बघण्याचा वेगवेगळा दृष्टिकोन आहे. तुम्ही 'एआय'च्या आधारे एखादं 'ॲप' किंवा 'सॉफ्टवेअर' बनवत असाल, तर त्यासाठी 'डेटा कलेक्शन'करता मॅनपॉवर लागणारच. 'कोडिंग'साठीही मनुष्यबळ लागेल. 'मॉडेलिंग'ला स्टॅटेस्टिशियन आणि मॅथेमॅटेशियन लागणार. 'टेस्टिंग', 'व्हॅलिडेशन'साठी माणसं लागतील. याचा अर्थ वेगळ्या स्वरूपात आपल्याला मनुष्यबळ लागणारच आहे. फक्त त्यांना त्यांची स्किल डेव्हलप करावी लागतील. 'एआय' म्हणजे सगळे बेकार होतील, असं अजिबात होणार नाही.'

'एआय'चा वापर कसा करायचा, यासाठी माणसाला कुठलीही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायची गरज नाही. ◘

# झोमॅटो गर्लला तुरुंगाबाहेर आणण्याचा कायद्याने वागाचा यशस्वी प्रयास



वाहतूक पोलिसांना शिवीगाळ केली, एवढ्या किरकोळ गुन्ह्यासाठी प्रियंका मोगरे या तरुणीला १४ महिने तुरुंगाची हवा खावी लागली. एखाद्याला अद्दल घडवण्यासाठी कायद्याचा आधार घेत पोलीस यंत्रणा कोणत्या थरापर्यंत जाऊ शकते, हे या घटनेतून दिसतं.

किरण सोनावणे

**'फो**टो का काढला माझ्या गाडीचा? XX **तुला बोलले होते ना? तुझ्या** XXX.'

'झोमॅटो'ची डिलिव्हरी गर्ल प्रियंका मोगरे ट्राफिक पोलिसाला अशा शिव्या घालत होती. तेव्हा तिला माहीत नव्हतं की, ही चूक तिला १४ महिने तुरुंगात पाठवणार आहे.

वाहतुकीचे नियम मोडणं, ही फार मोठी चूक नाही. पण या चुकीसाठी १४ महिने तुरुंगवास आणि 'सोशल मीडिया'वर बदनामी, असा जबर अनुभव प्रियंका मोगरे हिला घ्यावा लागला.

१४ महिन्यांपूर्वी ८ ऑगस्ट २०१९ रोजी नेमकं काय घडलं? प्रियंका सांगते, 'नवी मुंबईतील वाशीच्या सेक्टर १७ मध्ये एका 'ऑर्डर'ची डिलिव्हरी करण्यासाठी मी माझ्या बाईकवरून जात होती. तेवढ्यात मला मोबाईलवर 'कॉल' आला. तो कॉल रिसिव्ह करण्यासाठी मी बाईक बाजूला लावली आणि गाडीवर बसलेल्या स्थितीत कॉल घेतला.' प्रियंका फोनवर बोलत असताना तिच्या लक्षात आलं की, मागून ट्राफिक पोलीस तिच्या गाडीच्या नंबर प्लेटचे फोटो काढतोय. तेव्हा ती त्या ट्राफिक पोलिसाला म्हणाली, 'गाडीच्या पुढे पण नंबर प्लेट आहे, पुढून फोटो काढा. मी काही नियम मोडलेला नाही, मी 'हॉल्ट'वर आहे.'

प्रियंकाची बाईक 'नो पार्किंग' एरियात उभी होती. पण ती 'पार्क' केलेली नव्हती. ती साईडला करून त्यावर प्रियंका बसली होती. याला 'पार्किंग' नाही तर 'हॉल्ट' म्हणतात. पण या किरकोळ मुद्यावरून वादाला तोंड फुटलं आणि त्यात प्रियंकाचा तोल गेला. तिने पोलिसांना आणि 'टोईंग' गाडीवरील कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली.

ट्राफिक पोलीस आणि वाहनचालक यांच्यात अनेकदा अशी भांडणं होतात. त्यांपैकी काही प्रकरणाच्या 'क्लिप'देखील 'व्हायरल' होतात. मात्र, प्रत्येक प्रकरणात गुन्हा दाखल होतोच, असं नाही. एकमेकांसोबत बोलून माफी मागून, ताकीद देऊन प्रकरण तिथेच मिटवलं जातं. मात्र, या प्रकरणात एक 'डिलिव्हरी गर्ल' आपल्यासोबत अरेरावीची भाषा करते, हे पोलिसांना आवडलं नसावं. त्यांनी प्रियंकाला धडा शिकवण्यासाठी पोलीस स्टेशनवरून ज्यादा पोलीस मागवून घेतले. यावेळी प्रियंका अतिशय सभ्यतेने पोलिसांना प्रकरण काय आहे, ते सांगत असल्याचे 'व्हायरल व्हिडिओ'मध्ये दिसते.

तरीही पोलिसांनी तिला पोलीस स्टेशनमध्ये नेलं आणि तिच्यावर सरकारी कामामध्ये अडथळा आणण्याचा आणि दरोड्याचा प्रयत्न, शांततेचा भंग, धमकी देणं अशा आरोपांसाठी असलेल्या भारतीय दंड विधान (IPC)च्या ३५३, २९४, ३९३, ५०६ आणि ५०४ कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल करून तिला अटक केलं.

त्यानंतर पोलिसांनी काढलेला व्हिडिओ 'सोशल मीडिया'वर पसरला आणि तिथून तो 'न्यूज चॅनल्स'च्या कार्यालयात पोहोचला. प्रियंकाला कोर्टात हजर केल्यावर पोलिसांनी आपली बाजू जोरदारपणे मांडली. प्रियंकाच्या बाजूने बाजू मांडणारं पोलीस ठाण्याप्रमाणे कोर्टातही कुणी नव्हतं. त्यामुळे कोर्टाने प्रियंकाला जामीन मंजूर केला नाही. तिची रवानगी थेट भायखळा जेलमधील 'महिला सेल'मध्ये झाली. प्रियंकाला आपल्या साडेतीन वर्षांच्या लहान मुलीला सासूकडे सोपवावं लागलं.



एक महिन्याने प्रियंकाची 'केस' पुन्हा सुनावणीसाठी आली, तेव्हा कोर्टाने प्रियंकाला २५,००० रुपयांच्या दोन 'सॉल्व्हन्सी'(जामीनदार)वर जामीन मंजूर केला. मात्र, आपल्या मुलीसोबत एकट्या राहणाऱ्या प्रियंकाला तिच्या परिचितांनी, सासर-माहेरकडील लोकांनी वा मित्रमंडळींनी कोणतीही मदत केली नाही. त्यामुळे प्रियंकाला जामीन मंजूर होऊनही ती तुरुंगात अडकून पडली.

२८ वर्षांच्या प्रियंकाचं 'ग्रॅज्युएशन'पर्यंत शिक्षण झालंय. इंग्लिशसह सहा-सात भाषा बोलणाऱ्या प्रियंकाची कहाणी जाणून घेण्यासारखी आहे. प्रियंका आई-वडील विभक्त असलेल्या कुटुंबात आईकडे वाढली. पदवीधर झाल्यावर तिने स्वतःच्या गुणवत्तेवर अनेक नोकऱ्या केल्या. गोव्यातील एका कंपनीत ती आठ वर्षं 'एचआर' डिपार्टमेंटमध्ये कामाला होती. तिला बाईक रायडिंग, ट्रेकिंग, गाणी, घर सजवणं आणि स्वयंपाक करण्याची आवड आहे. तिने प्रेमविवाह केलाय, परंतु पतीशी न पटल्याने ती स्वतंत्र राहते. तिला एक मुलगी असून घटना घडली, त्यावेळी ती साडेतीन वर्षांची होती.

तुरुंगात असताना प्रियंकाने मित्रांकडे मदत मागून पाहिली, पण कुणीच मदत केली नाही. सासरच्यांनीही हात वर केले. म्हातारे वडील प्रियंकाला मदत करण्याचा स्थितीत नव्हते. बाहेर येण्यासाठी धडपड करूनही प्रियंका तुरुंगात राहिली.

फेब्रुवारी महिन्यात 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'च्या 'प्रयास' या कैद्यांशी संबंधित प्रकल्पाच्या 'टीम'ला प्रियंकाच्या 'केस'ची माहिती मिळाली. परंतु २२ मार्चपासून 'कोरोना-लॉकडाऊन'मुळे सर्व व्यवहार ठप्प झाले. तशाही परिस्थितीत 'प्रयास'ची टीम प्रियंकाला तुरुंगाबाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत होती. 'प्रयास'ला 'कायद्याने वागा' संघटनेनेही मदत करायला सुरुवात केली. दोन्ही 'टीम'नी दोन महिने पाठपुरावा केल्यानंतर प्रियंकाची नुकतीच १४ महिन्यांनी तुरुंगातून सुटका झालीय.

प्रियंका १४ महिन्यांपासून तुरुंगात असल्याची दखल स्थानिक पत्रकारांनी घेतली नाही. परंतु ती विदेशातील पत्रकारांनी घेतली. प्रियंकाच्या प्रकरणाची माहिती 'द वायर मराठी'ने २८ सप्टेंबर २०२० रोजी प्रसिद्ध केली. त्यानंतर **संध्या गोखले** यांनी त्याचं केलेलं इंग्रजी भाषांतर 'द वायर' या इंग्रजी 'वेबसाईट'वर ४ ऑक्टोबर २०२० रोजी प्रसिद्ध झालं. त्यावरून ही बातमी **फाउस्टो ज्यूडीचे** (Fausto Giudice) या लेखक-पत्रकाराने ५ ऑक्टोबरला फ्रेंच आणि ६ ऑक्टोबरला इटालियन भाषेतील 'ट्लाक्सकाला' (Tlaxcala) या 'वेबपोर्टल'वर प्रसिद्ध केली. प्रियंकाच्या जामिनासाठी किती पैशांची गरज आहे, अशी विचारणाही फाउस्टो ज्यूडीचे यांनी केली आणि कमी पडणारे पैसे युरोपातून उभे करण्याची तयारी दर्शवली.

इंग्रजी आणि विदेशी वृत्तपत्रांत ही बातमी आल्याने पोलीस, कोर्ट यंत्रणा हलली. वसई येथील डॉ. कैलासनाथ कोपीकर यांनीही मदत देऊ केली. मात्र 'प्रयास' आणि 'कायद्याने वागा'च्या टीमने जामिनाची रक्कम उभी केली.

दरम्यानच्या काळात 'प्रयास'च्या **रमा काळे** यांना पोलीस, वाशी येथील न्यायालय ते ठाण्याचे सत्र न्यायालय अशा अनेक चकरा माराव्या लागल्या. 'प्रयास'तर्फे **ॲड. भुजंग मोरे** यांनी जामिनाचे रूपांतर रोख रकमेच्या स्वरूपात करण्यासाठी ठाण्याच्या सत्र न्यायालयात पुन्हा अर्ज केला. २१ सप्टेंबर रोजी न्यायालयाने अर्ज मंजूर केला. रोख २५ हजार रुपये न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर प्रियंकाला जामिनावर सोडण्याचे आदेश न्यायालयाने दिले. पण त्यानंतरही बऱ्याच दिवसांनी ठाणे सत्र न्यायालयात २५,००० रुपये भरल्यानंतर प्रियंका तुरुंगाबाहेर येऊ शकली.



प्रियंका आणि मुलीची भेट चौदा महिन्यांनी झाली!

या साऱ्या प्रकरणाविषयी 'कायद्याने वागा' चळवळीचे **राज असरोंडकर** 'चित्रलेखा'ला सांगतात, 'विशिष्ट परिस्थितीत प्रियंकाने केलेल्या एका लहानशा चुकीबद्दल तिला १४ महिने तुरुंगात अडकवून ठेवण्यास पूर्णपणे पोलीस जबाबदार आहेत.'

प्रियंकापुढे आता जीवनात परत उभं राहण्याचं मोठं आव्हान आहे. वृद्ध आई-वडील, चार वर्षांची मुलगी, हातात पैसे आणि काम नाही, अशा स्थितीत असलेल्या प्रियंकाला पोलिसांनी तिच्यावर दाखल केलेला खटलाही लढायचा आहे. या कायदेशीर लढाईसाठी प्रियंकाला आर्थिक मदतीची गरज आहे. प्रियंकाची दुचाकीही पोलिसांनी जप्त केलीय. तिच्या घराचं भाडं थकलंय. तिची नोकरी गेलीय. म्हणूनच सरकारने तिच्यावरील गुन्हे मागे घेण्याची विनंती तिच्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सामाजिक संघटना करत आहेत.

'प्रियंकाच्या प्रकरणात कायद्याचा वापर तिला अद्दल घडवण्यासाठी केला गेलाय,' असा आरोप करत राज असरोंडकर सांगतात, 'जामीन मिळूनही प्रियंकाला तुरुंगात राहावं लागलं. तिची मोठ्या प्रमाणात बदनामी झाली. त्यामुळे सरकारने आता तिचं पुनर्वसन करावं.'

**प्रियंका मोगरे** सांगते, 'आता मला नव्या जीवनाची सुरुवात करायचीय. गोव्यातून मुंबईत आल्यानंतर मी दिवसाला दोन नोकऱ्या करायचे. दररोज २० तास काम करत होते. झोपही पुरेशी मिळत नव्हती. तरीही मुलीसाठी कष्ट करत होते. परंतु माझी कुठलीही चूक नव्हती. मी 'नो पार्किंग झोन'मध्ये बाईक 'पार्क' केली नव्हती. तिथे फक्त बाईक थांबवली होती आणि बाईकवर बसले होते. तरीही ट्राफिक पोलिसांनी दंड



प्रियंका मोगरेला जेलमुक्त करण्यासाठी 'लॉकडाऊन'च्या कठिण काळातही प्रयत्न करणारे ॲड. भुजंग मोरे आणि 'कायद्याने वागा' चळवळीचे प्रणेते राज असरोंडकर : कायद्याचा आधार घेत पोलीस कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतात, त्याचे हे प्रकरण पुरावा आहे.

केला. त्यातून माझा संताप अनावर झाला आणि माझ्याकडून शिवीगाळ झाली. परंतु या छोट्याशा चुकीची मला खूप मोठी शिक्षा सहन करावी लागली.'

तुरुंगात काढलेल्या दिवसांबद्दल बोलताना प्रियंका सांगते, 'अंडरट्रायल कैद्यांना वेगळी कामं द्यावी, असा नियम आहे. परंतु भायखळ्याच्या जेलमध्ये मला संडास साफ करण्यासह सगळी कामं करावी लागली. जेवण चोरीला जाण्यासारखे प्रकार घडायचे. इतर महिला कैद्यांची वागणूक खूप त्रासदायक होती. दुसरीकडे, मला अटक झाल्याचा व्हिडिओ पोलिसांनी 'व्हायरल' करून माझी प्रतिमा खूप खराब केलीय,' अशी खंतही प्रियंका व्यक्त करते.

प्रियंकाला आता मदत मिळेलही, परंतु या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित झालेत. उदाहरणार्थ, पोलिसांनी प्रियंकाचा काढलेला व्हिडिओ 'सोशल मीडिया'वर कसा आला? तो पोलिसांनी टाकला असेल, तर असे व्हिडिओ पोलिसांना टाकण्याची परवानगी कुठल्या पोलीस अधिकाऱ्याने किंवा विभागाने दिली? दरोड्याचं कलम प्रियंकावर का लावण्यात आलं? ती 'झोमॅटो'ची 'डिलिव्हरी गर्ल' होती आणि ती 'ऑर्डर' देण्यास जात होती, हे स्पष्ट आहे. तसंच ती एकटी होती. दरोड्याचं कलम लावण्यासाठी पाच किंवा पाचपेक्षा जास्त लोक असावे लागतात. तरीही प्रियंकाला या कलमात का अडकवण्यात आलं?

प्रियंकाच्या जामिनासाठी पैसे उभे केल्यावरही कोर्टाने वाशी न्यायालयातून ठाण्याच्या सत्र न्यायालयात आरोपपत्र आलंच नाहीय, असं सांगितलं. जानेवारीमध्ये आरोपपत्र दाखल होऊनही ते ठाणे सत्र न्यायालयात येण्यास एवढे महिने का लागले?

एकीकडे 'जामीन हा आरोपीचा अधिकार आहे', असं न्यायव्यवस्था म्हणते. परंतु अशा अटी घालते की, ज्यामुळे अतिशय किरकोळ किंवा सौम्य स्वरूपाचा गुन्हा असलेले अनेक कैदी जामीन मंजूर होऊनही तुरुंगात अडकून राहतात. ज्यांच्याकडे पैसा आणि 'पोहोच' आहे, ते चांगले वकील लावू शकतात. अनेक सराईत गुन्हेगारही लगेच जामिनावर सुटतात. मात्र, परिस्थितीने नाडलेले अनेक जण तुरुंगात अडकून पडतात, असं मत या घटनेबाबत सामाजिक कार्यकर्ते नोंदवतात.

राज असरोंडकर सांगतात, 'कायद्याचा आधार घेत एखाद्याला अद्दल घडवण्यासाठी पोलीस यंत्रणा कोणत्या थरापर्यंत जाऊ शकते, हे दाखवणारी ही घटना आहे. वाहतूक पोलीस कारवाई करतात, लोकांच्या गाड्या उचलतात, तेव्हा अनेकदा मार्गदर्शक तत्त्वांचं उल्लंघन करतात. त्यांना जाब कोण विचारणार? प्रियंका गुन्हेगार नाही. पोलिसांनी हे प्रकरण संवेदनशीलतेने हाताळायला हवं. या सगळ्यावरून आपल्या व्यवस्थेमध्ये बदल होण्याची किती गरज आहे, हेच दिसतं.' ◘

## कच्च्या कैद्यांच्या न्यायासाठी प्रयास

**'टाटा** इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स'च्या अंतर्गत 'प्रयास' हा प्रकल्प 'महाराष्ट्र सरकार' आणि 'तुरुंग प्रशासन' यांच्या सहकार्याने राबवला जातो. या प्रकल्पात 'अंडरट्रायल' (कच्च्या) कैद्यांना कायदेशीर मदत, अत्याचार पीडित महिला- मुलं यांना मदत आणि त्यांचं पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जातो. हा प्रकल्प गेली ३० वर्षं महाराष्ट्र आणि गुजरातमधील काही जिल्ह्यांत सुरू असून याअंतर्गत आतापर्यंत ४०,००० कैद्यांना मदत झालीय, असं प्रकल्पाचे प्रमुख **विजय राघवन** सांगतात.



# राम हा आर्य नव्हे!

राम हा आर्यावर्तातील राजा नसून, त्याचा आचार- विचार इजिप्तशियन संस्कृतीशी मिळताजुळता आहे. त्याचे हे रामायणातील पुरावे पहा.

भास्करराव जाधव

इजिप्तमध्ये पुरोहित किंवा याजक वर्गाचे मोठे महत्त्व असे. दररोज हवनाच्या वेळी राजाला ईशप्रार्थना ऐकविली जाई. तीत त्याच्या राज्यव्यवस्थेतील चुकांबद्दल क्षमा भाकण्यात येई. पुढे एक प्रवचन होई. त्यात मागील राजांचे दाखले देऊन राजाने कसे वागले पाहिजे, हे त्याच्या मनावर ठसविण्यात येई. यातून भिन्नभिन्न शहरांच्या देवळांची उत्पन्ने वाढली व त्यामुळे सुंदर मंदिरे बांधता आली. परिणामी, याजकांची संपत्तीही फार वाढली.

वाल्मीकी 'रामायण'मध्ये देवस्थानांचे वर्णन नाही. काशी येथील विश्वनाथ हे प्रसिद्ध पुरातन देवस्थान आहे; पण त्याचाही उल्लेख कोठेच मिळत नाही. रामकाली मूर्तिपूजाच नव्हती असे म्हणावयाचे की काय? इतिहासात इजिप्तच्या व तेथील प्राचीन धर्मात प्रत्येक शहराचा एकेक प्रसिद्ध देव असे व राजा या प्रत्येक देवस्थानचे दर्शन घेऊन तेथे

हवन करीत असे. 'रामायणा'त ही देवस्थाने मुळीच नमूद नाहीत. त्यांची जागा ऋषींच्या आश्रमांनी पटकाविली आहे.

या आश्रमात कोठेही देवांच्या मूर्ती नाहीत. प्राचीन इजिप्तच्या राज्यात राजाकडे मुख्य काम राष्ट्राच्या भरभराटीकरिता नित्य व नैमित्तिक हवन, यज्ञ वगैरे करणे हे असे. आर्यांच्या स्मृतींप्रमाणे मुख्य काम 'दंड' म्हणजे न्याय देणे, हे असे. प्राचीन इजिप्तात न्याय देण्याचे काम स्वतंत्र असलेले न्यायाधीश करीत. राजाची लहर वगैरे त्यात चालत नसे. म्हणून तेथे राजा हा फार लोकप्रिय असे.

**ज्या ठिकाणी राज्यघटनेप्रमाणे राज्यकारभार चालतो व राजा केवळ त्या घटनायंत्राचे एक चक्र होऊन राहतो, तेथे राजा हा प्रजेला फार प्रिय असतो हा अनुभवच आहे.** इंग्लंडच्या राजाचे महत्त्व व लोकप्रियतेचे मूळ यातच आहे. याच कारणाने प्राचीन इजिप्तात राजा लोकप्रिय असे व म्हणूनच रामराज्याची कीर्ती तिकडे दुमदुमत होती.

रामायणकारांनी तिकडील काव्याचे रूपांतर करून ही कथा आर्यावर्तातील असल्याचा भास उत्पन्न केला. त्यामुळे रामराज्याची कल्पना येथेही पसरली व आज प्रजेला सुख देणाऱ्या राजाला रामाची व त्या राज्यकारभाराला रामराज्याची उपमा देण्यात येत असते. पण ही कल्पना अगदीच परदेशी आहे. असो. मागील लेखात रामचरित्रातील दोन प्रसंग घेऊन त्या-त्या प्रसंगी रामाने केलेले वर्तन आर्यांच्या स्मृतिवचनांस विरुद्ध कसे होते, हे दाखविले आहे.

**पहिले उदाहरण वालीयुद्धाचे!** वाली हा सुग्रीव नावाच्या आपल्या भावाबरोबर द्वंद्वयुद्ध करण्यात गुंतला असता त्यावर रामाने बाण सोडून त्याचा वध केला. हे कृत्य मन्वादि सर्व स्मृतिकारांच्या मताने क्षत्रियास न शोभण्यासारखे अधर्म्य आहे. ते रामाने केले व त्या कामाची त्याला शरमही वाटली नाही. यावरून राम हा भिन्न संस्कृतीचा असावा व त्या संस्कृतीप्रमाणे असे कृत्य निंद्य नसावे म्हणूनच त्याच्यासारख्या वीराने ते बिनदिक्कत आचरणात आणले असे अनुमान निघते.

**दुसरे उदाहरण रामाच्या दिनचर्येचे होते.** राम हा दिवसाचा अर्धा भाग यज्ञ, आहुती वगैरे धर्मकृत्यांत घालवी व पुढला अर्धा भाग आणि रात्र जनानखान्यात ऐषआरामात घालवी. प्रत्यक्ष राज्याचा कारभार भरताकडे सोपविला होता. आर्यस्मृतिकारांच्या मताप्रमाणे, राजाचे पहिले व मुख्य काम प्रजेची गाऱ्हाणी ऐकून ती दूर करणे व नंतर इतर गोष्टी, असे आहे. धर्मकर्म करण्यास जरूर तर पुरोहिताची नेमणूक करावी, अशी सवलत दिलेली आहे. याप्रमाणे राजाचे कर्तव्य राज्यकारभारावर स्वतः नजर ठेवणे हे आहे.

रामाचे वर्तन या आर्यपद्धतीस सुटून झालेले आहे. रामाचा सर्व काळ धर्मकृत्यात किंवा सुखोपभोगांत जाई व प्रजा रक्षणासाठी भरताची योजना होती. हा आचार प्राचीन इजिप्त देशात होता, असे सर फ्लिंडर्स पेट्री यांच्या ग्रंथातील उताऱ्यावरून दाखविले आहे. तशा प्रकारचा आचार रामाकडून घडला असल्याने राम हा पुराण इजिप्तचा राजा असावा, अशा अनुमानास बळकटी येते.

**तिसरे उदाहरण सीता-त्यागाचे आहे.** रावणाने सीतेला जबरदस्तीने उचलून नेली व ती त्याच्या अशोक वनात एक वर्ष होती. अशोक वन हे नावाप्रमाणे अरण्य नव्हते, तर ती विलास भोगण्याची एक उत्कृष्ट बाग होती. हनुमान सीताशोधासाठी लंकेस गेला, तेव्हा त्याने या अशोक वनाचे वर्णन केले आहे. त्यात एक रम्य नदी असून नानाप्रकारच्या पक्षिगणांनी युक्त असलेली सरोवरे आहेत, असे कपिश्रेष्ठ वायुपुत्र हनुमानाने अवलोकन केले आहे.
(संदर्भ : सुंदरकांड-अध्याय १४, श्लोक ३२ )

# रामायणावर नवा प्रकाश






**भास्करराव जाधव** *(जन्म :१६ जून १८६७; मृत्यू २६ जून १९५०)* उच्च शिक्षित आणि कठोर बुद्धिप्रामाण्यवादी होते. राजर्षि शाहूराजांच्या कोल्हापूर संस्थानाच्या कारभारात त्यांना आणि त्यांच्या विचाराला विशेष स्थान होते. पुढे ते मुंबई राज्य कायदे मंडळाचे सदस्य आणि मंत्रीही झाले. आपल्या प्रदीर्घ सामाजिक आणि राजकीय कार्य प्रवासात त्यांनी लेखन केले. ते वैचारिक, संशोधनात्मक होते. त्यातील 'रामायण' विषयक लेखन त्यांच्या प्रथम स्मृतिदिनी १९५१ मध्ये रामायणावर नवा प्रकाश या नावाने ग्रंथरूपात प्रकाशित झाले. त्याचे पुनर्प्रकाशन १९९१मध्ये 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ' यांनी केले. ३०० पृष्ठांचा हा ग्रंथ मुळापासून वाचवा आणि संग्रही असावा, असा आहे. 'कोरोना-लॉकडाउन' होताच ३० वर्षांपूर्वी गाजलेल्या रामानंद सागर निर्मित 'रामायण' मालिका 'दूरदर्शन'वर सरकारने सुरू केली. त्याच वेळी त्यातली काल्पनिकता आणि अधर्म व्यवहार दाखवणारी ही संपादित लेखांची मालिका 'e-चित्रलेखा'तून क्रमशः सुरू झाली. त्यात 'रामायणाचे मूळ विदेशी,' सीता, राम, मारुती आदि लेखांचा समावेश आहे. सत्य किती कठोर असते, याचा अनुभव आपणास सोबतच्या लेखावरून येईल.

*– संपादक*

यापुढील श्लोकात म्हटलंय, 'शीत जलाने परिपूर्ण अशी एक तयार केलेली वापीही तेथे त्याने पाहिली. त्या वापीला उत्कृष्ट रत्नाच्या पायऱ्या केलेल्या होत्या. मोत्याच्या वाळूने ती सुशोभित झालेली होती. (३३) नानाप्रकारच्या पशुसमुदायांनी ती मनोहर दिसत होती. सभोवती असलेल्या चित्रविचित्र वनांनी ती युक्त होती आणि विश्वकर्माने निर्माण केलेल्या प्रचंड राजवाड्यांनी (३४) व कृत्रिम वनांनीही ती सर्व बाजूनी भूषित झालेली होती.'

या वर्णनावरून, एकंदरीत अशोक वन ही चैनीने विलास करण्यासाठी उत्तम प्रासाद असलेली मोठी, सुंदर, मनोहर बाग होती व त्यात रावणाने सीतेला ठेविले होते, हे स्पष्ट होते.

'अशोक वन' हे विशेष नाम नसून अशा प्रकारच्या विलासोपभोग करण्याच्या स्थानाला ते सामान्य नाम असावे. उत्तरकांडाच्या ४२व्या अध्यायात पहिल्याच श्लोकात अयोध्येतील अशोक वनात राम सीतेसह क्रीडण्यास गेल्याचा उल्लेख आहे. तो असा–

**स विसृज्य ततो रामः पुष्पक्रं हेमभूषितम् ।**
**प्रविवेश महाबाहुः अशोकवनिकां तदा ।।१ ।।**

अर्थात, 'या वनातही लंकेप्रमाणेच अनेक वृक्ष व सुंदर पक्षी होते. वापीही होत्या, त्यात माणकाच्या पायऱ्या केल्या होत्या, त्यांच्या आतील फरशी स्फटिकांची केलेली होती.'

**नंदनं हि यथेंद्रस्य ब्रह्मं चैत्ररथं यथा ।**
**तथाभूत हि रामस्य काननं संनिवेशनम् ।।१५**
**वव्हासनगृहोपेता लतासनस्तमावृताम् ।**
**अशोकवनिकां स्फीतां प्रविश्य रघुनंदनः।।१६**


म्हणजे, 'इंद्राच्या नंदनवनाप्रमाणे अथवा. ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या चित्ररथाच्या वनाप्रमाणे त्या रामाच्या वनाचा आकार होता. (१५) विपुल आसने व गृहे यांनी युक्त असून लतासनांनी व्याप्त झालेल्या त्या भव्य अशोक वनामध्ये रघुनंदन रामाने प्रवेश केला.' (१६)

एकंदरीत सीतेला लंकेतील अशोक वनात ठेविले होते, ते वन अयोध्येतील विलास वनाप्रमाणेच होते. लंकेत व अयोध्येत सीता ही अशोक वनात होती.

रामापासून वियोग झाल्यामुळे सीता फार कष्टी असे. तिच्या विरहावस्थेचे वर्णन हनुमानाने केलेले आहे. रामाने रावणाचा वध केल्यावर पहिले काम बिभीषणाकडून रावणाच्या शवाची व्यवस्था लावण्याचे केले व दुसरे काम त्याला लंकेचा राजा म्हणून अभिषेक करविला, हे होते.

लंकापूरवासी प्रजेने बिभीषणाकडे 'मंगल नजराणा' आणला, तो त्याने तसाच रामाला अर्पण केला.

यानंतर रावणवधाची वार्ता कळविण्यास सीतेकडे हनुमानास पाठविले. 'रामायणा'तील युद्धकांड, सर्ग ११२मध्ये ते असे आले आहे.



'अशोक वन' हे अरण्य नव्हते, तर ती रावणाची विलासी बाग होती, असे वर्णन हनुमंताने 'रामायण'मध्ये केले आहे.

**अनुज्ञाप्य महाराजं इमं सौम्य विभीषणम् ।**
**प्रविश्य नगरी लंका कौशलं ब्रुहि मैथिलीम्।।२४**
**वैदेह्या मां च कुशलं सुग्रीवं च सलक्ष्मणम्।**
**आचक्ष्व वदतां श्रेष्ठ रावणं च हतं रणे ।।२५**
**प्रियमेतदिहाख्याहि वैवेद्यास्त्वं हरीश्वर ।**
**प्रतिगृह्य तु संदेशं उपावर्तितुमर्हसि ।। २६**

अर्थ, 'हे सौम्य, बिभीषणाची आज्ञा घेऊन तू लंकानगरीमध्ये जा आणि सीतेला कुशल वर्तमान कळीव (२४). हे वक्त्यामध्ये श्रेष्ठ हनुमाना, मी व सुग्रीवासहवर्तमान लक्ष्मण कुशल असून रणामध्ये रावणाचा वध झाल्याचे तू सीतेला कळव (२५). हे वानराधिपते, हे प्रियवृत्त सीतेला कळीव व तिचा निरोप घेऊन इकडे परत ये.(२६)'

त्याप्रमाणे हनुमान अशोक वनात गेला. त्याने संस्कारसहित सीता अवलोकन केली. सीतेला त्याने रामाचा निरोप जरा विस्तारपूर्वक खुलवून सांगितला. सीता हर्षोत्मादाने बोलण्यास असमर्थ झाली. हनुमानाने पुन्हा प्रश्न केल्यावर, ती बोलू लागली. पुढे परत जाताना हनुमान म्हणाला, 'रामाची तू गुणसंपन्न आणि योग्य धर्मपत्नी आहेस. हे देवी माता, रामाला काही निरोप सांगावयाचा असल्यास तू माझ्यापाशी सांग. म्हणजे मी जिकडे राम आहे तिकडे जातो.' सीतेने सांगितले,' भक्तवत्सल भर्त्याच्या दर्शनाची मला इच्छा आहे.' हा निरोप हनुमानाने रामास कळविला. (सर्ग ११३)

हा निरोप ऐकून रामाला अश्रू आले व दीर्घ सुस्कारा टाकून पृथ्वीकडे पाहात तो बिभीषणाला म्हणाला, 'दिव्य उटी लावून व दिव्य अलंकारांनी भूषित होऊन शिरःस्नात झालेल्या सीतेला तू येथे घेऊन ये. विलंब लावू नकोस.' त्याप्रमाणे बिभीषणाने अलंकार लेववून सीतेला रामाकडे आणले. राम आपले हृद्गत तोंडाने बोलून दाखवू लागला. (सर्ग ११५, श्लोक १)

**एषासि निर्जिता भद्रे शत्रुं जित्वा रणाजिरे ।**
**पौरुषाद्यवनुष्ठेयं मयैतदुपपादितम्।।२**

**गतोऽस्म्यंतममर्षस्य घर्षणा संप्रमार्जिताय।**
**अवमानश्च शत्रुश्च युगपन्निहतो मया।। ३**
**अद्य मे पौरुषं दृष्टं अद्य मे सफलः श्रमः ।**
**अद्य तीर्णप्रतिज्ञोऽ हं प्रभवाम्यद्य चात्मनः ।। ४ ***
**या त्वं विरहिता नीता चलचित्तणे रक्षसा ।**
**दैवसंपादितो दोषो मानुषेण मया जितः ।।५**
**संप्राप्तमवमानं यस्तेजसा न प्रर्माजति**
**कस्तस्य पौरुषेणार्थो महताप्यल्पचेतसा ।।६**

अर्थात, 'हे कल्याणी, संग्रामामध्ये शत्रूचा पराजय करून तुला मी जिंकून आणले आहे. पुरुष-प्रयत्नाने जे काही करता येण्यासारखे आहे ते हे मी केले आहे. (२) आज क्रोधाची समाप्ती झाली असून शत्रूने केलेल्या स्त्रीहरणरूप अपमानाचीही मी फेड केली आहे. आणि अपमान व शत्रू या दोहोंचेही पारिपत्य मी एकदमच केले आहे. (३) आज माझा पराक्रम लोकांच्या दृष्टी पडला. माझ्या श्रमाचे सार्थक



रावणाचा स्पर्श झाल्याने रामाने सीतेला कलंकित ठरवणे, हे आर्यधर्म स्मृतिविरोधी आहे.

झाले. आज मी आपली प्रतिज्ञा शेवटास नेली आणि आज मी स्वतंत्र झालो. (४) चंचल चित्ताने युक्त झालेल्या राक्षसाने तुला एकटी असता नेले, हा अनर्थ दैवामुळे घडला व तो मी मनुष्याने साध्या पराक्रमाने नाहीसा केला. (५) अपमान झाला असता जो तेजाच्या योगाने त्याचे परिमार्जन करीत नाही त्या मंदमती पुरुषाचा पराक्रम मोठा जरी असला तरी त्याचा उपयोग काय?' (६)

याप्रमाणे बोलत असलेल्या रामाचे भाषण ऐकून सीता अश्रूंनी भरून गेली आणि मनाला प्रिय असलेल्या सीतेकडे पाहाणाऱ्या रामाचे हृदय लोकापवादाच्या भीतीने द्विधा झाले. (सर्ग ११५, श्लो. १०,११) पुढे राम तिला म्हणाला, 'रावणाचा वध अपमान परिमार्जनाकरिता मी केला व तुला परत मिळविली. पण हा सारा खटाटोप मी तुझ्या प्राप्तीसाठी केलेला नव्हता.' (१३।१४ )

यापुढच्या रामाच्या भाषणावरून त्या काळच्या कुलीन म्हणविणाऱ्या पुरुषाचे विचार कळून येतात. ते असे-

- रावणवध करून सीतेला जिंकून आणले. (सर्ग ११५।२)
- शत्रूने स्त्री हरण केली, हा अपमान पुसून न काढणाऱ्याच्या पराक्रमाचा काय उपयोग ?
- रावणाचा वध हा रामाने अपमानमार्जनाकरिता केला होता. सीतेच्या प्राप्तीच्या लोभाने केला नाही. (श्लो. १३।१४)
- सीता हरण करून नेली, हा वंशाला कमीपणा आला होता. तोही रामाने शत्रुवधाने घुऊन काढला.
- सीतेच्या वर्तनासंबंधाने संदेह आल्यामुळे तिने पाहिजे तिकडे जावे. अर्थात तिचा त्याग केला.
- परक्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीला, कुलीन पुरुष पुन्हा आपली स्त्री करणार नाही.
- म्हणून परपुरुषाच्या अंकाचा स्पर्श झालेल्या व त्याची पाप दृष्टी पडलेल्या सीतेचा स्वीकार कुलीन म्हणविणारा राम करणार नाही.
- सीतेसारखी सुंदर स्त्री रावणाच्या घरी शुद्ध राहणे संभवनीय नाही.

यातील पहिल्या मुद्यावरून रामाला आर्यांची विवाहसंस्था मान्य नव्हती, असे दिसते. सीतेला जिंकून आणल्याकारणाने तिची वाटेल तशी व्यवस्था लावण्यास राम मुखत्यार होता. म्हणून त्याने 'तू वाटेल तिकडे जा,' असे तिला सांगितले. 'लग्नबंधन तुटले' अशीच त्याची समजूत.

दुसरा, तिसरा व चौथा हे मुद्दे वस्तुतः एकच आहेत. सीतेची पुनः प्राप्ती हा युद्धाचा हेतूच नाही. वंशाच्या इभ्रतीचा बचाव करण्यासाठी युद्ध केले.

पाचवा व सहावा या मुद्यांचा विचार एकत्र करणे बरे! परक्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीचा स्वीकार कुलीनाने करता नये. म्हणून सीतेच्या शुद्ध वर्तना संबंधाने शंका आल्याने तिला हाकून देणेच योग्य! यावरून स्त्रीच्या इच्छेविरुद्ध कोणी तिचा उपभोग घेतल्यास ती स्त्री टाकून देण्यास पात्र होते व तिच्याशी झालेला विवाहसंबंध तुटतो, असा रामाच्या भाषणाचा आशय आहे. इतकेच नव्हे, तर रावणाच्या अंकाचा (मांडीचा) स्पर्श झालेल्या व जिच्यावर रावणाची पापदृष्टी पडली, त्या सीतेचा स्वीकार रामासारख्या कुलीन राजाने करणे योग्य नाही, असे राम मोठ्या आढ्यतेने सांगत आहे.

स्त्रियांच्यासंबंधाची ही हलकी कल्पना व व्यभिचार दोषास्तव स्त्रीचा त्याग; या गोष्टी रामाला कितीही पसंत असल्या, तरी त्या आर्यांच्या सर्व स्मृतिकारांच्या मताविरुद्ध आहेत. कारण आमचे पूर्वीचे सर्व स्मृतिकार हे रामाच्या मताविरुद्ध आहेत. त्यांनी स्त्रीच्या इच्छेविरुद्धच्या जोरजबरदस्तीत स्त्री कलंकित ठरत नाही, हे स्पष्टपणे सांगितले आहे. उलट, व्यभिचार हे पातक गणून त्यांनी स्त्री व पुरुष या उभयतांसही प्रायश्चित्त सांगितले आहे. या न्यायानुसार राम सीतेशी वागत नाही. यावरून राम आमच्या हिंदी संस्कृतीत वाढलेला नसून परक्या संस्कृतीचा अभिमानी आहे, असे दिसून येते.

*(पुढील अंकी: **रामायणकर्ता वाल्मिकी**)*

****** यशाचा ******

# PASSWORD



## कमीपणाची भावना काढून टाका!

**नितीन बानुगडे-पाटील**

इतिहास अभ्यासक, लेखक व प्रेरणादायी वक्ते

(nitinbpatil.07@gmail.com)

डग्लस बेडर हे सुप्रसिद्ध ब्रिटिश वैमानिक! ब्रिटिश सैन्यात असलेल्या त्याच्या वडिलांचा पहिल्या महायुद्धात मृत्यू झाला. तेव्हा बेडर फक्त बारा वर्षांचा होता. विलक्षण नि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावरच डग्लस बेडर वयाच्या एकविसाव्या वर्षी 'रॉयल एअर फोर्स'मध्ये निवडला गेला. घरच्यांचा प्रखर विरोध असताना तो 'एअर फोर्स'मध्ये सामीलही झाला.

अतिधाडसी असलेला बेडर विमानाच्या थरारक कसरती करू लागला. एका मित्रासोबत पैज लावून विमानाची कसरत करून दाखवताना, एक भयंकर अपघात झाला. त्यात अत्यंत जखमी अवस्थेत त्याला दवाखान्यात आणले गेले. जखमी बेडरचे दोन्ही पाय गुडघ्यापासून कापावे लागले.

दवाखान्यात डग्लस बेडर पुन्हा विमान उडवण्याची स्वप्न रंगवू लागला. त्याच्या मनाला भीती अजिबात शिवली नव्हती. त्याची इच्छाशक्ती अफाट होती. पण स्वप्नपूर्तीसाठी आधी त्याला चालणे आवश्यक होते. चालण्यासाठी त्याला लोखंडाचे कृत्रिम पाय लावण्यात आले. काठीच्या आधाराने तो हळूहळू चालण्याचा प्रयत्न करू लागला.

काही दिवसांतच त्याने हातातील आधाराची काठी फेकून दिली. 'मला कसल्याही आधाराची गरज नाही. माझा मार्ग मीच बनवणार आहे,' असं तो म्हणे. अखेर तो चालू लागला.

आता त्याने पुढचं ध्येय ठरवलं. 'आपण पूर्वी खेळत होतो, त्या चपळाईने 'गोल्फ' खेळायचं!'

पण ज्याला वेगात चालणेही जमत नव्हते, तो कृत्रिम पायांवर 'गोल्फ' कसा खेळणार होता? पण डग्लसची जिद्द अफाट! त्याने 'गोल्फ' खेळणं सुरू केलं. पहिलाच 'शॉट' मारताना त्याचा तोल गेल्याने तो कोसळला. एकदा नव्हे तर तो तब्बल चाळीस वेळा पडला. अखेर एकेचाळिसाव्या वेळी त्याने न पडता 'शॉट' मारला.

बघता बघता तो कार चालवू लागला. डग्लस बेडर जेव्हा सुटाबुटांत चालत येई, तेव्हा त्याचे पाय कृत्रिम आहेत, यावर लोकांचा विश्वास बसत नसे. पण त्याचं ध्येय पुन्हा आकाशात भरारी मारायची, हे होते. अनेकांना त्याची ती कल्पनेची भरारी वाटायची. पण आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर डग्लसने १९३९मध्ये कसलेल्या वैमानिकासारखं पुन्हा विमान चालवलं. त्याला पुन्हा 'रॉयल एअर

पण डग्लसची बातच और! जे नाही त्याबद्दल दुःख नाही, जे आहे त्याबद्दल कमीपणाची भावना नाही! आहे त्या परिस्थितीत फक्त लढायचं नि साऱ्यावर मात करीत ध्येय गाठायचं! या विलक्षण इच्छाशक्तीने भारावलेल्या डग्लस बेडरने 'नाझीं'च्या ताब्यातून पळून जायचेही प्रयत्न केले. पण तो अपयशी ठरला. पुढे युद्ध संपल्यावर त्याची सुटका झाली.



फोर्स'मध्ये प्रवेश मिळाला. त्यावेळेस ब्रिटिश सैन्याकडे वैमानिकांचा तुटवडा होता.

डग्लस बेडरने आपल्या अपंगत्वावर मात करत दुसऱ्या महायुद्धात असामान्य कामगिरी बजावली. त्याने एकट्याने शत्रूची तेवीस विमानं पाडली. प्रसिद्ध 'बिग विंग फॉर्मेशन' तयार करण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

१९४१च्या सर्वात यशस्वी वैमानिकांत डग्लस बेडरचे नाव अग्रभागी होते. अनेक पुरस्कार त्याला मिळाले. परंतु,१९४१च्या ऑगस्टमध्ये त्याच्या विमानाला अपघात झाला आणि तो 'नाझीं'च्या तावडीत सापडला. तोवर त्याची कीर्ती जगभर पसरल्याने परिणाम टाळण्यासाठी, 'नाझीं'नी त्याला ठार न करता कैदेत ठेवलं.

ही कैद मानसिक खच्चीकरण करणारी होती.

युद्धानंतरही 'व्हिक्टरी फ्लाय पास्ट'च्या ३०० विमानांच्या ताफ्यांचं नेतृत्व या पांगळ्या वैमानिकाकडे होतं. एवढी एकच गोष्ट, त्याचा गौरव करण्यासाठी पुरेशी आहे. त्याला 'ब्रिटिश नाईटहूड' या सर्वोच्च पुरस्काराने गौरवण्यात आलं.

या गौरवाबद्दल डग्लस बेडर म्हणाला, 'यशस्वी व्हायचंच असेल तर, आपण हे करू शकणार नाही, ही मनातील भीती काढून टाका!'

ही नकारात्मकताच तुम्हाला लढण्याअगोदर पराभूत करते. संकटं जेवढी मोठी होत जातील, तितकीच तुमची इच्छाशक्तीही मोठी करत राहा!

लक्षात ठेवा, तुम्ही सहज नि सोपं निवडलंत तर जगणं अवघड होईल! मात्र अवघड नि कठीण निवडलंत, तर जगणं सहज नि सोपं होईल! ○

हाउस ऑफ किचनवेर
ग्लेर
आपका हरवक्त का साथी

## माईलस्टोन

- अलीकडेच एका संशोधनातून स्पष्ट झालंय की, माणसावर 'कोकेन' किंवा 'मॉर्फिन' या मादक पदार्थांचा जसा अंमल चढतो, तसा अंमल उंदरावर विशिष्ट प्रकारची बिस्किटं खाऊन चढतो.
- जर्मनीच्या बर्लिनमधील एका कोल्ह्याने जंगलाजवळच्या रहिवासी भागातून १०० हून अधिक चपला चोरल्या होत्या.
- अमेरिकेतील ओक्लाहामा या राज्याचं 'टरबूज' हे 'राज्य-फळ' आहे.
- सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मंगळावर निळा रंग पसरतो.
- अमेरिकेचे राष्ट्रपिता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेंजामिन फ्रँकलिन यांच्या घराच्या तळघरातून १९९८ पर्यंत १,२०० हून अधिक मानवी हाडं सापडली होती.
- खोल समुद्रात सापडणाऱ्या 'बॅरलफिश'च्या डोक्याचा भाग पारदर्शक असतो.



# वादाचा बॉम्ब

यंदा दिवाळीत फुलबाजे किंवा लवंगी तडतडतील की नाही, ते ठाऊक नाही. परंतु अक्षयकुमारचा 'लक्ष्मी बॉम्ब' नक्की फुटेल. थिएटरऐवजी डायरेक्ट 'ओटीटी'वर (९ नोव्हेंबरला 'हॉटस्टार') प्रदर्शित होणारा हा अक्षयकुमारचा पहिलाच चित्रपट आहे.



'लक्ष्मी बॉम्ब' हा नऊ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'मुनी टू : कंचना' या तमिळ चित्रपटाचा हिंदी 'रिमेक' आहे. त्याचा 'ट्रेलर' गेल्या आठवड्यात रिलीज झाला आणि वादाचे फटाकेही फुटले. 'ट्रेलर'मधून असं लक्षात येतं की, हिरोला भुतांची प्रचंड भीती वाटते. भुताच्या नावाने थरथर कापणाऱ्या हिरोच्या शरीरात काही भुतं प्रवेश करतात. त्यात एका स्त्रीचाही आत्मा असतो. त्यामुळे या कथेला एक 'टर्निंग पॉईंट' येतो. हिरो अचानक स्त्रीसारखा वागू लागतो आणि साडी वगैरे नेसू लागतो.

आता वादाबद्दल. मूळ तमिळ चित्रपटात नायक-नायिकेचं नाव राघव-प्रिया होतं. हिंदी 'रिमेक'मध्ये ते आसिफ-प्रिया का? चित्रपटाचं शीर्षकही आक्षेपार्ह वाटतं. भारतीय संस्कृतीप्रमाणे समृद्धीची देवता असलेल्या 'लक्ष्मी' आणि 'बॉम्ब'चा काय संबंध?

दुबईतील गगनचुंबी इमारत 'बुर्ज खलिफा'च्या पार्श्वभूमीवर याच इमारतीच्या नावाचा उल्लेख असलेलं गाणं चित्रित करण्यात आलंय. चित्रपटात विनाकारण घुसवण्यात आलेल्या या गाण्यामागचं गणित समजावून सांगताना एका खबरीने रघुला सांगितलं, ''बुर्ज खलिफा'चे मालक आणि 'दुबई टुरिझम'ने आपल्या प्रसिद्धीसाठी निर्मात्यांना भरपूर पैसे दिलेत.'' परंतु 'लक्ष्मी बॉम्ब'शी संबंधित असलेला हा पहिलाच वाद नाही.

चित्रपट निर्मितीअवस्थेत असताना डायरेक्टर राघवेंद्र लॉरेन्सने काही 'क्रिएटिव्ह डिफरन्सेस' झाल्याने चित्रपट मध्येच सोडला. त्यानंतर अक्षयकुमारने राघवेंद्रची समजूत काढली. विशेष म्हणजे, मूळ तमिळ चित्रपटातील 'कंचना'चं मुख्य पात्र राघवेंद्रनेच साकारलंय.

या चित्रपटाला विरोध करणाऱ्या 'हिंदू सेना'ने नाव न बदलल्यास चित्रपटावर बहिष्कार घालण्याचं आवाहन केलंय. या संघटनेने माहिती आणि प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांना याविषयी पत्र पाठवलंय. या चित्रपटाच्या कलाकार आणि तंत्रज्ञांनी मात्र वादाविषयी मौन धारण करणं पसंत केलंय.

# दिवाळी ओटीटी धमाका

**'भारत** सरकार'ने १५ ऑगस्टपासून नियम आणि अटींसह 'थिएटर्स' उघडायला परवानगी दिलीय. परंतु महाराष्ट्रात अजूनही थिएटर्सचं टाळं उघडलेलं नाही. ते कधी उघडेल, हे सांगणंही अवघड आहे. त्यामुळे यंदा 'दिवाळी'सारख्या मोठ्या सणाला महाराष्ट्रात तरी 'बिग बजेट' चित्रपट रिलीज होणार नाहीत. अक्षयकुमारचा 'सूर्यवंशी' दिवाळीत प्रदर्शित करण्याची घोषणा निर्मात्यांनी केली होती. परंतु नंतर ही तारीख पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे यंदा थिएटर्सऐवजी 'ओटीटी'वरच दिवाळी धमाका बघायला मिळेल, अशी परिस्थिती आहे.

दिवाळीच्या काळात 'हॉटस्टार'वर अक्षयकुमारचा 'लक्ष्मी बॉम्ब' हा रिलीज होईल. याच सुमारास 'नेटफ्लिक्स'वर अनुराग बसूचा 'ल्युडो' प्रदर्शित होईल. 'अमेझॉन प्राईम व्हिडिओ'वर राजकुमार रावचा 'छलांग'ही झळकेल. १९९०च्या दशकातील शेअर घोटाळा प्रकरणातील आरोपी हर्षद मेहताच्या जीवनावरील अभिषेक बच्चनची भूमिका असलेला 'द बिग बुल' निर्मात्यांना 'ओटीटी'वर प्रदर्शित करायचाय. अजय देवगण आणि संजय दत्त यांच्या भूमिका असलेला 'भूज : द प्राईड ऑफ इंडिया' हा युद्धपटदेखील 'ओटीटी'वर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. मात्र, या दोन्ही चित्रपटांची तारीख जाहीर झालेली नाही. आणखीही काही निर्मात्यांनी 'ओटीटी'वर आपले चित्रपट प्रदर्शित करण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतु त्यांच्याकडून नंतर काहीच घोषणा झालेली नाही.

दुसरीकडे, थेट 'ओटीटी'वर चित्रपट 'रिलीज' केल्यानंतर प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद न मिळाल्याने काही निर्मात्यांना आपले तेच चित्रपट आता थिएटर्समध्ये 'रिलीज' करायचेत. परंतु आघाडीच्या 'मल्टिप्लेक्स चेन'नी हे चित्रपट पुन्हा थिएटर्समध्ये 'रिलीज' करायला नकार दिलाय. या निर्मात्यांना आपलं नुकसान भरून काढण्याचा दुसरा मार्ग उरलेला नाही. यामुळेच इतर अनेक निर्मात्यांच्या मनात अजूनही 'ओटीटी' की, थिएटर्स याबद्दल संभ्रमावस्था आहे.

अक्षयकुमारचा 'लक्ष्मी बॉम्ब' किती जोरात फुटतोय, याकडे सगळ्यांचं लक्ष असेल.

**दी एंड** 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे'ला नुकतीच २५ वर्षं झाली. त्यावेळी 'डीडीएलजे'शी संबंधित 'व्हायरल' झालेल्या अनेक 'मिम'पैकी एक असे आहे- 'जा कोरोना जा... जिने दे हमे अपनी जिंदगी!'

# लाखमोलाची चूक

'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन,' असं म्हणतात. ही म्हण अमेरिकेतील मिशिगन प्रांतात राहणाऱ्या समीर माझहेम यांच्या बाबतीत खरी ठरली.

समीर माझहेम हे अंध नाहीत. परंतु त्यांनी केलेल्या एका चुकीमुळे त्यांना लॉटरीचा 'डबल जॅकपॉट' लागला. घडलं असं की, समीर माझहेम यांनी 'मेगा मिलियन ड्रॉ' लॉटरीची तिकिटं लॉटरी कंपनीच्या 'ॲप'वरून काढली. त्यांनी आपल्या कुटुंबीयांच्या वाढदिवसाचे नंबर असलेलं पहिलं तिकीट काढलं. हे आकडे त्यांना लॉटरी कंपनीच्या 'ॲप'मध्ये 'फेवरेट' म्हणून 'सेव्ह' करायचे होते. जेणेकरून पुन्हा कधी लॉटरीचं तिकीट काढायचं असेल, तर हेच आकडे असलेलं तिकीट काढता यावं. परंतु हे आकडे 'सेव्ह' करायला ते विसरले. तिकीट काढल्यानंतर त्यांच्या हे लक्षात आलं. म्हणून त्यांनी पुन्हा 'ॲप' ओपन करून आपले आवडते आकडे 'सेव्ह' केले. या गडबडीत पहिल्या तिकिटासारखे आकडे असलेलं दुसरंही तिकीट त्यांच्या नावावर विकलं गेलं.



विशेष म्हणजे, ही बाब माझहेम यांच्या लक्षातही आली नाही. काही दिवसांनी आपण काढलेल्या लॉटरी तिकिटाचा निकाल लागला काय, हे पाहण्यासाठी लॉटरी कंपनीचं 'ॲप' उघडलं, तेव्हा त्यांना धक्काच बसला. कारण त्यांच्या तिकिटाला १ मिलियन डॉलर्सचा (अंदाजे ७ कोटी ३५ लाख रुपये) 'जॅकपॉट' लागला होता. आपण चुकून दोन तिकिटं विकत घेतलीत, हे त्यांच्या तेव्हाही लक्षात आलं नाही. काही महिन्यांनी त्यांनी लॉटरी कंपनीचं 'ॲप' पुन्हा उघडलं, तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की, आपल्या चुकीने आपल्याला आणखी एक मिलियन डॉलर्स कमावून दिलेत. कारण या दुसऱ्या तिकिटावरही 'लकी नंबर्स'च होते.

'डबल जॅकपॉट'चे ५६ वर्षांचे विजेते समीर माझहेम यांनी इनामाची रक्कम घर बांधण्यासाठी आणि आपलं उर्वरित आयुष्य मजेत घालवण्यासाठी वापरण्याचं ठरवलंय.

# पुरुषांनो, कॉफिनमध्ये जा!

**तिचं** नाव एलिस कॉफिन. ती फ्रेंच नागरिक आहे. सर्वसामान्य नागरिक नाही, तर पॅरिसच्या महापालिकेची नगरसेविका आहे. तिने लिहिलेलं एक पुस्तक अलीकडेच प्रकाशित झालं. त्यात तिने समस्त महिलांना असं आवाहन केलंय, 'पुरुष जात निकम्मी आहे. पुरुषांशी कुठल्याही प्रकारचे संबंध ठेवू नका. सगळे संबंध तोडून टाका.'

ही बया एवढ्यावरच थांबलेली नाही. पुरुषांवर आपला किती राग आहे, हे सांगण्यासाठी या पुस्तकात पुढे तिने असंही लिहिलंय, 'मी पुरुष लेखकांचं एकही पुस्तक वाचलेलं नाही. पुरुष दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेला एकही चित्रपट बघत नाही. एखाद्या पुरुषाने संगीतबद्ध केलेलं गाणंही ऐकत नाही. मी लग्न केलेलं नाही. कारण मला पुरुषाचा बलात्कार सहन करायचा नाही.'

समलिंगी संबंधांचं समर्थन करणारी एलिस आपल्या पुस्तकात असंही म्हणते की, 'समस्त पुरुषांची जमात पृथ्वीवरून नामशेष करायला हवी!'

एलिसचा पुरुषांवर इतका राग का, हे मात्र तिने पुस्तकात लिहिलेलं नाही.

अर्थात, एलिसने पुरुषांवरील सगळा राग या पुस्तकात काढलाय खरा. परंतु तिच्या या पुरुषांना नामशेष करण्याच्या विधानामुळे काही स्त्रीवादी तिच्यावर तुटून पडलेत. एलिसविरोधात धार्मिक फतवेही काढण्यात आल्याने तिला घाम फुटलाय.

'सगळेच पुरुष वाईट नसतात', असं म्हणून तिने आता सारवासारव करण्याचा प्रयत्न केलाय. पण लोकांची नाराजी कमी झालेली नाही. लवकरच एलिसच्या फ्रेंच पुस्तकाचा इंग्लिश अनुवाद प्रकाशित होणार आहे. त्यानंतर तिने किती पुरुषद्वेष्टेपणा केलाय, हे साऱ्या जगाला कळेल. ◻

**वेलची**

तुमच्या खिशात लाखोंचा खळखळाट असावा!
पण त्यामागे कोणाचा तळतळाट नसावा!!

सदा अग्रेसर साप्ताहिक

# चित्रलेखा.com

CHITRALEKHA

## तुमच्या आवडीचं साप्ताहिक आता तुमच्या डिजिटल डिव्हाईस वर




STEPS

1. वर्गणी भरण्यासाठी व्हिजिट: chitralekha.com/marathi/emag
2. चित्रलेखा मराठी ई-मॅगेझीन सबस्क्राईब करा.
3. तुमच्या मनपसंत डिवाईसवर Log in करून वाचनाचा आनंद घ्या..

इथे इ-मेल करून अधिक माहिती मिळवा- web@chitralekha.com